रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक १०१
www.ramprahar.com

• बुधवार, २९ ऑक्टोबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा विकास होणार/२
कामगार नेते संदेश बामणे यांचा भाजपमध्ये प्रवेश/५
महिला सहकाऱ्यावर अत्याचार; गुन्हा दाखल/६

## पंतप्रधान मोदी आज मुंबई दौऱ्यावर; वाहतुकीत बदल



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी (दि.२९) मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. दुपारी ते गोरेगाव (पूर्व) येथील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित 'इंडिया मेरीटाईम वीक (IMW) २०२५' मध्ये 'मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्ह'ला संबोधित करतील. तसेच, ग्लोबल मेरीटाईम सीईओ फोरमचे अध्यक्षस्थानदेखील पंतप्रधान भूषवतील. हा कार्यक्रम जागतिक स्तरावरचा सर्वात मोठा सागरी मेळावा ठरणार असून, त्यात सागरी क्षेत्रातील विविध प्रमुख हितधारक एकत्र येणार असल्यामुळे परिसरात व्यापक वाहतूक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदींच्या कार्यक्रमानिमित्त मुंबई वाहतूक पोलिसांनी जोगेश्वरी-गोरेगाव परिसरात तात्पुरते वाहतूक निर्बंध आणि मार्ग बदल लागू केले आहेत. हे निर्बंध २७ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत दररोज सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत लागू राहणार आहेत, अशी माहिती दिली आहे.

# ४० लाख पूरग्रस्तांच्या खात्यात आठ हजार कोटी जमा -मुख्यमंत्री

## सरकार १५ दिवसांत ११ हजार कोटी देणार

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यात यंदा झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे प्रभावित झालेल्या लाखो शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२८) मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, आतापर्यंत ४० लाख पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात आठ हजार कोटी रुपयांची मदत जमा करण्यात आली आहे. याशिवाय, आणखी ११ हजार कोटी रुपयांच्या वितरणाला मंजुरी देण्यात आली असून, हे पैसे पुढील १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पोहचवले जाणार आहेत. हे रिलिफ पॅकेज अर्थसंकल्पीय तरतुदीबाहेरील असल्यानं विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, जशा याद्या येतील, तशी निधी वितरणाला मान्यता द्यायची आणि संपूर्ण याद्या येईपर्यंत थांबायचे नाही, असा निर्णय आम्ही सुरुवातीपासून घेतला होता. त्यामुळे कुणालाही मनात शंका बाळगण्याचे कारण नाही. ज्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या नुकसानीसाठी पैसे मिळाले आहेत, त्यांच्या खात्यात तिसऱ्या हेक्टरच्या नुकसानीसाठीही पैसे जमा करण्यास सुरुवात झाली आहे. पुढील १५ ते २० दिवसांत सर्व शेतकऱ्यांच्या खात्यात पूर्ण मदत पोहचेल. आम्ही ९० टक्के शेतकऱ्यांना तातडीने ही मदत पोहचवण्याचा प्रयत्न करत आहोत. उर्वरित १० टक्क्यांपैकी काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तांत्रिक अडचणी आहेत. काहींच्या रेकॉर्ड्समध्ये समस्या आहेत किंवा काही ठिकाणी मल्टिपल होल्डिंग आहे. या समस्या सोडवण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.

या रिलिफ पॅकेजबाबत अधिक माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हे २१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जाणार आहे. त्यापैकी ८ हजार कोटी वितरित झाले आहेत. ११ हजार कोटी वितरित करण्यास आज मंजुरी देण्यात आली आहे आणि १ हजार ५०० कोटी रुपये स्वतंत्रपणे वितरित करण्यात येत आहेत. अशाप्रकारे संपूर्ण पॅकेज रिलीज करण्यात येत आहे, असं त्यांनी सांगितले.

शिवसेनेचे (उबाठा) नेते आदित्य ठाकरेंनी केलेल्या मतचोरीच्या आरोपांवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझी अपेक्षा होती की आदित्य ठाकरेंनी मी महाराष्ट्राचा पप्पू आहे, असे प्रदर्शन करू नये. पण ज्याप्रकारे राहुल गांधींनी मोठी स्क्रीन लावून 'खोदा पहाड, निकला चुहा' करून दाखवले, तेच आदित्य ठाकरेंनी केले. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे निवडणूक आयोगाने आधीच दिलेली आहेत. माझी एवढीच अपेक्षा आहे की, किमान तुम्ही राहुल गांधी बनू नका, असा टोलादेखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

## मंत्रिमंडळ बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय

- *विकसित महाराष्ट्र-२०४७च्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट गठीत करणार.*
- *राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार. सचिव पदनाम विस्तारास मान्यता.*
- *महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत.*
- *निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश २०२५ला मान्यता.*
- *धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालय. याशिवाय शासकीय अभियोक्ता कार्यालय होणार.*
- *वाशिम जिल्ह्यातील सुविदे फाउंडेशन, रिसोड यांना मौजे करडा येथील २९.८५ हे. आर जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नाममात्र दराने ३० वर्षांकरिता नुतनीकरणास मान्यता*

# राज्यातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा रौप्य महोत्सव

## राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाला एक लाख रुपये, तर रायगड जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक, सामाजिक, कला. क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २५व्या अर्थात रौप्यमहोत्सव राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निर्मिती व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गेल्या २४ वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २५वी स्पर्धा आहे.

भरघोस रक्कमेची पारितोषिक असलेल्या या स्पर्धेच्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस एक लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार तर ततीय क्रमाकांस ३० हजार रूपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील लक्षवेधी उत्कृष्ट अंकाला १५ हजार रुपये, सर्वोत्कृष्ट विशेषांकाला १५ हजार रुपये, उत्कष्ट कथेसाठी सात हजार रूपये, उत्कष्ट कविता, उत्कष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ठ लेख, लक्षवेधी परिसंवाद, लक्षवेधी मुलाखत व उत्कृष्ठ मुखपृष्ठ यांना प्रत्येकी पाच हजार रुपये, त्याचबरोबर बालसाहित्याच्या सवोत्कष्ट अंकास ७५०० रूपये, सर्वोत्कृष्ट डिजिटल अंकाला ७५०० रुपये तसेच रायगड जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रूपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रूपये आणि ततीय क्रमाकांस १० हजार रूपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ०५ हजार रुपये, उत्कृष्ठ कथा, कविता आणि व्यंगचित्र यांना प्रयेकी पाच हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. **(पान २ वर..)**

### दिवाळी अंकांना प्रोत्साहन

राज्यातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठित म्हणून ओळखली जाणारी हि दिवाळी अंक स्पर्धा यंदा रौप्यमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गेली २५ वर्षे ही स्पर्धा सातत्याने आयोजित होत असून, राज्यभरातील विविध दिवाळी अंकांना प्रोत्साहन देत आहे. राज्यातील दिवाळी अंकांच्या समृद्ध परंपरेला आणि सर्जनशीलतेला बळ देण्याच्या हेतूने सुरू झालेली ही स्पर्धा आज संपादक, लेखक, कलाकार आणि वाचक यांच्यातील सृजनशीलतेचा दुवा आणि संवादाचे व्यासपीठ म्हणून ओळखली जाते.

## निवडक

### तुर्कीमध्ये ६.१ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप, बचावकार्य सुरू

**अंकारा :** तुर्कीमध्ये जोरदार भूकंप झाला. या भूकंपामुळे तीन इमारती कोसळल्याची माहिती आहे. आपत्कालीन व्यवस्थापन एजन्सीच्या माहितीनुसार, पश्चिम तुर्कीमध्ये सोमवारी रात्री ६.१ तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू बालिकेसिर प्रांतातील सिंदिरगी शहरात होता. तर राजधानी इस्तंबूलमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. जीवितहानीचे वृत्त नसले तरी बचाव आणि मदत करण्याचे काम पथक करत आहेत.

### आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या स्थापनेला मंगळवारी मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे सुमारे ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख निवृत्तीवेतनधारकांना थेट लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. सरकारने जानेवारीमध्येच या आयोगाला तत्वतः मंजुरी दिली होती, मात्र आता त्याचे औपचारिक गठन करण्यात आले आहे.

## रायगडसह कोकण किनारपट्टीला हवामान विभागाचा अलर्ट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मोंथा चक्रीवादळाचा परिणाम सध्या राज्यावर दिसतोय. अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरणासह जोरदार पाऊस होत असून वारेही सुटले आहे. हे चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याचे संकेत आहेत.

मोंथा चक्रीवादळामुळे रत्नागिरी जिल्ह्याला यलो अलर्ट जारी करण्यात आलाय. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून मोंथा चक्रीवादळाचा मोठा धोका आहे. रत्नागिरी जिल्ह्यात चौथ्या दिवशीही जोरदार पाऊस सुरू आहे. राज्यामध्ये या चक्रीवादळाचा परिणाम दिसून येतोय. मेघगर्जनेसह आणि वादळी वाऱ्यासह जिल्ह्याच्या काही भागात जोरदार पावसाची शक्यतादेखील आहे. किनारपट्टी भागात वेगवान वारे ताशी ४० ते ४५ किलोमीटर वेगाने वाहणार. आजदेखील मच्छीमारांना खोल समुद्रात मच्छीमारीसाठी जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलंय. गेल्या काही दिवसांपासून राज्यात पावसाने थैमान घातलेले असतानाच आता या चक्रीवादळामुळे अनेक भागात जोरदार पाऊस होतोय.

**तीन नंबरचा लाल बावटा**

यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून खबरदारी घेतली जातंय. किनारपट्टी भागात सकाळपासून ढगाळ हवामान आहे. काल रात्रीदेखील जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. आणखीन दोन दिवस कोकण किनारपट्टीवरती पावसाची शक्यता आहे. रायगडमध्येही समुद्र खवळलेला असून उंच लाटा येण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे या ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून तीन नंबरचा लालबावटा फडकवण्यात आला आहे.

**मच्छीमारांना आवाहन**

सुरक्षेच्या कारणास्तव सर्व मच्छीमारांनी आपल्या नौका किनारी लावल्या असून समुद्रात न जाण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काही तासांमध्ये पावसाची व वाऱ्याची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. समुद्रातील वादळ सदृश्य परिस्थितीचा फटरा गणपतीपुळे किनाऱ्याला बसला. गणपतीपुळे समुद्र किनाऱ्यावर जोरदार वादळी वारे वाहत आहे. गणपतीपुळ्यातील समुद्र खावळला आहे.

## नाटककार गंगाराम गवाणकरांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



मालवणी बोलीभाषेतील 'वस्त्रहरण' या पाच हजारांहून अधिक प्रयोग करणाऱ्या लोकप्रिय नाटकाचे लेखक गंगाराम गवाणकर यांचे सोमवारी रात्री प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते.

गवाणकर यांच्यावर दहिसर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. 'वस्त्रहरण'सारखे कालातीत नाटक देणाऱ्या गवाणकर यांनी व्यंगात्मक मांडणी असलेली नाटके लिहिली.

दरम्यान, मालवणी बोलीचा गोडवा आणि ठका जग भरणारा, कोकणातील बहुमुखी प्रतिभा अशा साहित्यिक, नाटककाराला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत महान नाटककार गंगाराम गंगाराम यांना मुख्यमंत्री गंभीर श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## बदनामीची धमकी देत मुलीवर लैंगिक अत्याचार

### अलिबागमधील प्रकार; गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

फोटो व्हायरल करण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना अलिबाग शहर परीसरात समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे गेली दीड वर्षे या मुलीवर अत्याचार सुरू होता. याप्रकरणी अलिबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या पिडीत अल्पवयीन मुलीचा तिच्या मित्रासोबतचा फोटो या आरोपी तरूणाच्या हाती लागला. हा फोटो तिच्या कुटुंबियांना दाखवण्याची आणि व्हायरल करण्याची धमकी देत या तरूणाने तिला ब्लॅकमेल करण्यास सुरूवात केली. हा फोटो तुझ्या कुटुंबियांना दाखवतो, व्हायरल करतो असे तो तिला धमकावत असे. या तरूणाने पिडीत मुलीला आपल्या घरी बोलावले. आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. हा प्रकार गेली दीड वर्षे सुरू होता.

हा जाच असह्य झाल्याने अखेर या मुलीने अलिबाग पोलीस ठाणे गाठले आणि आपल्यावरील अत्याचाराची तक्रार दिली. तिच्या तक्रारीवरून आरोपी तरूण दीर्घ काळ पीडित मुलीचा मानसिक व शारीरिक छळ करत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक ज्योत्स्ना मासे करीत आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते खारघरमध्ये इनोव्हेशन गॅलरीचे उद्‌घाटन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या खारघर येथील रयत सेन्टेनरी इनोव्हेशन अँड इंक्युबेशन फाउंडेशन येथील इनोव्हेशन गॅलरीचे उद्‌घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि.२८) केले. या इनोवेशन गॅलरीमध्ये नव उद्योजकांनी अविष्कार केलेल्या प्रॉडक्ट व सर्विसेस प्रदर्शित केल्या जातील.

रयत शिक्षण संस्थेचा उपक्रम असलेल्या RCIIF या ठिकाणी विद्यार्थी आणि व्यावसायिकांच्या संशोधन आणि कौशल्य विकासाला चालना दिली जाते आणि त्यांना उद्योजक होण्यामध्ये मदत केली जाते. रयत सेन्टेनरी इनोव्हेशन अँड इंक्युबेशन फाउंडेशनने मार्गदर्शन केलेल्या कागपत्र नावाच्या स्टार्टअप च्या नवउद्योजक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. नवउद्योजकांनी झी टीव्हीवरील नुकत्याच प्रदर्शित झालेल्या आयडियाबाज या स्टार्टअपवर आधारित रियालिटी शोमध्ये सहभाग घेतला. तसेच रामशेठ ठाकूर साहेबांनी युनूस सय्यद यांच्या भारत टेली क्लिनिक या ग्रामीण भागासाठी तयार केलेल्या वैद्यकीय प्रॉडक्ट आणि सर्विसेस बद्दल त्यांचे कौतुक केले.

या निमित्ताने रामशेठ ठाकूर साहेबांनी रयत सेन्टेनरी इनोव्हेशन अँड इंक्युबेशन फाउंडेशनच्या कामकाजाचा आढावा घेतला व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. इनोव्हेशनवर आधारित स्टार्टअपची भारताला आत्मनिर्भर होण्यासाठी अत्यंत गरज असून त्यावर नव उद्योजकांनी भर द्यावा, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित असणाऱ्या नव उद्योजकांना केले.

या वेळी त्यांनी रयत सेन्टेनरी इनोव्हेशन अँड इंक्युबेशन फाउंडेशन येथील स्टार्टअपच्या प्रॉडक्ट व सर्विसेस प्रदर्शनास भेट दिली. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे सचिव माननीय विकास देशमुख, डॉ. रवींद्र घोडविंदे, आरसीआयआयएफचे संचालक परेश पारेख, डॉ. शुभदा नायक आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सीईओ दिनेश इसरानी, सीओओ देववृत जाधव व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## खारघरमध्ये छटपूजा उत्साहात

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



खारघर शहरातील सेक्टर १४ येथील तलावाजवळ भारतीय जनता पक्षाच्या खारघर मंडलाच्या वतीने छटपूजेचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या धार्मिक सोहळ्याला पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

छटपूजा हा उत्तर भारतातील एक अत्यंत प्राचीन व पवित्र सण आहे. ही पूजा प्रामुख्याने सूर्यदेव आणि छठमातेच्या आराधनेसाठी केली जाते. सूर्यदेवाला ऊर्जा व आरोग्याचा अधिष्ठाता देव मानले जाते. या दिवशी उपासक उपवास धरून नदी, तलाव किंवा जलाशयाच्या किनारी उभे राहून उदयास्त सूर्याला अर्घ्य अर्पण करतात. हा सण निसर्ग, शुद्धता आणि शिस्तीचा प्रतीक मानला जातो. छठमातेच्या आराधनेनंतर मंडळाच्या वतीने मोठ्या प्रमाणात प्रसादाचे वाटप करण्यात आले. टेकवा प्रसाद, केळी आणि विविध फळांचा समावेश असलेला हा प्रसाद श्रद्धाळूना देण्यात आला.

या वेळी खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष संतोष शर्मा, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, समीर कदम, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अमर उपाध्याय, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, आदित्य हातगे, दीपक ठाकूर, हार्दिक पटेल, मयूर घरत, पप्पू खामकर आणि सिद्धेश खेडकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या सोहळ्यात परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत छटमातेची पूजा-अर्चना केली.

# रायगड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा समुह विकास होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने अंतर्गत समूह विकास योजनेसाठी जिल्ह्याची निवड झाली आहे. यातून रायगड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा समुह विकास केला जाणार आहे.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात परिसरातील नियोजन भवन येथे मंगळवारी (दि. २८) केंद्रीय सचिव अभिलाक्ष लाखी यांच्या उपस्थितीत या उपक्रमाची पहिली बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, संज पांडे, माधवन ब्रिंदा, पी जयगोपाल आणि रायगडचे मत्स्यव्यवसाय सहआयुक्त संजय पाटील , मत्स्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने अंतर्गत देशात ३४ ठिकाणी समुह विकास प्रकल्प राबविले जाणार आहेत . यात रायगड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. या योजनेतून रायगड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा समुह विकास केला जाणार आहे. या योजनेच्या अमंलबजावणीसाठी रायगड जिल्हा मत्स्यव्यवसाय सहकारी संघाची स्थापना केली जाणार असून त्यामाध्यमातून पुढील पाच वर्षात विविध विकास प्रकल्प हाती घेतले जाणार आहे.या प्रकल्पामुळे मत्स्य उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होणार आहे. त्याच बरोबर ८०० ते १००० जणांना थेट रोजगार उपलब्ध होणार आहे.

या समुह विकास योजने अंतर्गत जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे एकत्रिकरण केले जाईल, त्यानंतर मच्छीमारांना अधुनिक पायाभूत सुविधा, प्रक्रीया सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. प्रकल्प कार्यालयाची उभारणी, शितगृह सुविधा, बर्फ कारखाना, मत्स्य प्रक्रीया उद्योग, वातानुकूलित वाहने, सौर उर्जेवर चालणाऱ्या शितपेट्या, बाजार आणि विक्री केंद्रांची उभारणी यासारख्या घटकांवर हा निधी खर्च होणार आहे.

### रायगड जिल्ह्याची निवड


रायगड जिल्ह्याला १२२ किलोमीटरचा विस्तिर्ण समुद्र किनारा लाभला आहे. जिल्ह्यात ४ हजार ९७५ यांत्रिक नौका असून, या माध्यमातून दरवर्षी जवळपास ३३ हजार टन मत्स्यउत्पादन घेतले जाते. जिल्ह्यात १५६ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था असून २२ हजार ३४५ मच्छीमार सदस्य आहेत. शेती, पर्यटन आणि उद्योगानंतर मत्स्यव्यवसाय हा रोजगारक्षम व्यवसाय आहे.

# पनवेलमध्ये आंदोलनकाळातील 'त्या' अंधाराला जबाबदाराविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील विजेच्या अचानक गायब होण्यामागे मानवी हस्तक्षेप असल्याचे अखेर वीज महावितरण कंपनीच्या चौकशीत स्पष्ट झाले आहे. आंदोलनाच्या काळात वीजपुरवठा खंडित करून नागरिकांना त्रास देणाऱ्यांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वीज महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनादरम्यान ९ ऑक्टोबर रोजी दुपारी पनवेल शहरातील वीज पुरवठा अचानक खंडित झाल्याने शहरात गोंधळ माजला होता. शेकडो नागरिक रस्त्यावर उतरले, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाणीवपूर्वक वीज यंत्रणा बंद केल्याची शक्यता व्यक्त करून कठोर कारवाईची मागणी केली होती. अखेर सुमारे १७ दिवसांच्या चौकशीनंतर वीज महावितरण कंपनीने या प्रकरणाचा खुलासा केला आहे.



प्राथमिक तपासात असे निष्पन्न झाले की, पनवेल शहरातील वीज पुरवठा नियंत्रित करणाऱ्या विज व्यवस्थापन युनिट (आर.एम.यु.) केंद्रातील यंत्रणा जाणूनबुजून बंद करण्यात आली होती. या यंत्रणेची माहिती असलेल्या व्यक्तीनेच हे कृत्य केल्याची शंका वर्तविण्यात आली असून, संबंधित व्यक्तीचा शोध अद्याप सुरू आहे. यामुळे महावितरण कंपनीने सोमवारी अनोळखी व्यक्तीविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

राज्यभरातील महावितरण कर्मचाऱ्यांनी त्या काळात आंदोलन पुकारले होते. त्याच वेळी पनवेल शहरात दुपारी तीनच्या सुमारास तुलसी हाइट्स, अशोक विजय सोसायटी, चिल्ड्रन पार्क, उर्दू शाळा आणि महापालिका मैदान परिसरात दीर्घकाळ वीज गायब होती. जलशुद्धीकरण केंद्रालाही वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिक आणि महापालिकेला मोठा त्रास सहन करावा लागला.

घटनेनंतर नागरिकांच्या संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीस उपायुक्त प्रशांत मोहीते आणि पनवेल शहर पोलिसांनी नागरिकांची समज काढत वीज व्यवस्था तातडीने पूर्ववत करण्याचे निर्देश दिले. महावितरणचे कार्यकारी अभियंता जितेंद्र माने यांच्या चौकशीतून या प्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली असून, सर्वसामान्यांना अंधारात ठेवणाऱ्या या कटाचा सूत्रधार कोण हे शोधणे आता पोलिसांपुढील मोठे आव्हान ठरणार आहे.


# अवकाळी पाऊस रविवारपर्यंत पडणार

## पावसाचा आंबा पिकावर परिणाम होणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले 'मोंथा' चक्रीवादळ आणि अरबीसमुद्रात निर्माण झालेला कमीदाबाचा पट्टा यामुळे २ नोव्हेंबरपर्यंत पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्याचा परिणाम आंबा पिकावर होण्याची शक्यता आहे.

मान्सूनचा पाऊस परत गेला असला तरी मागील काही दिवसांपासून राज्यात किनारपट्टीच्या भगत पाऊस पडत आहे. या पावसामुळे रायगड जिल्ह्यात भातपिकाचे मोठे नुकसान झाले आहे. आता ' मोंथा' चक्रीवादळामुळे पाऊस पडत आहे.



३० ऑक्टोबर पर्यंत हा पाऊस पडेल असे सांगण्यात आले होते.

वादळाच्या परिणामामुळे हा पाऊस २ नोव्हेंबर पर्यंत पडेल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

मान्सून परतल्यानंतर लगेचच अवकाळी पाऊस सुरू झाला. ऑक्टोबर महिन्याचे ऊन पुरेसे मिळाले नाही. हे ऊन आंबा मोहरासाठी आवश्यक असते. पाऊस पडत असल्यामुळे थंडी देखील लांबणार आहे. त्याचा परिणाम आंबा मोहरावर होईल.मागील आठवड्यापासून पडत असलेल्या पावसामुळे.भातशेतीचे नुकसान झाले आहे.

या नुकसानीचे पंचनामे.करण्याचे आदेश. देण्यात आले आहेत. पंचनामे सुरू करण्यात आले.आहेत अशी माहिती कृषि विभागाने दिली.

# नानोसे-सुधागड येथून एक जण बेपत्ता

**पाली : रामप्रहर वृत्त**



आकाश तानाजी सोमवंशी (वय २७, मूळ रा. लातूर, सध्या रा. नानोसे, सुधागड, जि. रायगड) हा दि ५ ऑक्टोबर २०२५ रोजी नानोसे येथून मुळगावी बेळसांगवी, जिल्हा लातूर, येथे जातो असे सांगून निघून गेला तो परत न आल्याने पाली पोलीस ठाण्यात त्याची बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. बेपत्ता आकाश अंगाने सडपातळ, चेहरा उभट, रंग गहूवर्ण, डाव्या हातात AS असे गोंदवलेले आहे. त्याचेबाबत कोणाला काहीएक माहिती मिळून आल्यास तात्काळ पाली पोलीस स्टेशन येथे कळवावे. पाली पोली ठाणे ०२१४२-२४२२२३ अथवा भरत शिवाजी सोमवंशी, (नातेवाईक) ९३२२५२३८८७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीवर्धनमध्ये आरटीओ कँम्पमुळे वाहतूककोंडी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन येथे २८ ऑक्टोबर रोजी प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांचा कॅम्प होता. हा कॅम्प पूर्वी जसवली येथील जुन्या आयटीआय जवळ घेतला जात असे. त्यामुळे शहरात वाहतुकीची समस्या निर्माण होत नसे. परंतु मागील काही दिवसांपासून सदरचा कॅम्प मोरया बीच रिसॉर्ट च्या समोर घेतला जात आहे. पण आज २८ ऑक्टोबर रोजी अवधूत मंदिर परिसरामध्ये कॅम्प घेतला गेल्याने मोठमोठे डंपर, पासिंगसाठी आलेल्या गाड्या याच्या रांगेमुळे स्थानिक नागरिकांना व पर्यटकांना त्रास सहन करावा लागत होता.

सदरचा मार्ग हा श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग आहे. यावेळी जर का कोणाचे मयत आले असते तर, नागरिकांना खांद्यावर तिरडी घेऊनच उभे राहावे लागले असते. एवढ्या मोठ्या प्रमाणात ट्राफिक जाम



झाले होते. तसेच अवधूत मंदिर परिसर हा श्रीवर्धन परिसरातील नागरिकांची उत्तर कार्य करण्यासाठी ठेवलेला आहे. या ठिकाणी दहावे, बारावे ही सर्व प्रकारची उत्तरकार्य केली जातात. अशा सार्वजनिक ठिकाणी प्रादेशिक परिवहन विभागाचा कॅम्प घेणे कितपत योग्य आहे? याचा विचार प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी करण्याची आवश्यकता आहे.

# निवृत्त वेतनधारकांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयात प्रमाणपत्र सादर करावे

**अलिबाग: रामप्रहर वृत्त**

शासनाच्या ज्या निवृत्ती वेतन धारकांना व कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना जिल्हा कोषागाराकडून निवृत्त वेतन प्रदान केले जाते. त्या सर्व निवृत्तवेतन धारकांनी व कुटुंब निवृत्त वेतनधारकांनी हयात असल्याबाबतचे प्रमाणपत्र दि.१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सादर करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी दिपक बोडके यांनी केले आहेनिवृत्ती वेतनधारकांचे हयात प्रमाणपत्र विहीत मुदतीत कोषागारात प्राप्त झाल्याशिवाय पुढील वेतन प्रदान केले जाऊ शकत नाही. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्ती वेतनधारकांनी कोषागार कार्यालयाकडून संबंधित बँकेकडे पाठविण्यात आलेल्या घोषण पत्रावर स्वत: हयात असल्याबाबत बँक व्यवस्थापक यांच्या समक्ष दिनांकीत स्वाक्षरी करावी. ही घोषणा पत्रे संबंधित बँकांकडे पाठविण्यात आली आहेत.

# उमेदवारांच्या विजयाची मदार अस्थायिक मतदारांवर

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता काही दिवसांवर येऊन ठेपली असून इच्छुकांनी त्याचप्रमाणे अनुभवी उमेदवारांनी आतापासूनच आपल्या प्रभागातील मतदार याद्या चाळण्यास सुरुवात केली आहे.

माथेरान मध्ये जवळपास चार हजारांच्या आसपास मतदार संख्या आहे. परंतु यातील निम्म्याहून अधिक मतदार हे इथे रहात नसून काहींच घरदार आहे, काहींचे फक्त नातेवाईक राहतात तर काही शासकीय अधिकारी कर्मचारी वर्ग आहेत की ज्यांची फक्त मतदार यादीत नावे समाविष्ट आहेत परंतु ते इथे वास्तव्यास नाहीत.काही वर्षांपूर्वी नोकरी धंद्यानिमित्त इथे रहात होते परंतु सेवानिवृत्त झाल्यावर आपापल्या गावी मुक्कामी गेले आहेत. ज्यांचा इथल्या समस्यांविषयी अथवा विकास कामांबाबत काहीएक घेणेदेणे नाही असे जवळपास दीड ते दोन हजार मतदार अस्थायिक असून याच मतदारांवर इथल्या उमेदवारांचं भवितव्य अवलंबून आहे.याच मतदारांना निवडणूक काळात गोंजारले जात असून इथे स्थानिक




असणाऱ्या उमेदवारांना अस्थायिक मतदारांसाठी नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

या अस्थायिक मतदारांशी जवळजवळ महिनाभर संपर्क साधला जातो आणि त्यांना मतदानाच्या आदल्या दिवशी स्वखर्चाने मोटार वाहन पाठवून आणले जाते. एखाद्या राजेशाही प्रमाणे यांना सोयीसुविधा पुरविल्या जात असून मतदान करून हे मतदार आपल्या प्रभागातील दोन्ही उमेदवारांकडून आयते खिसा भरून जात असतात. हे अनेक वर्षांपासून इथे पहावयास मिळत आहे. त्यासाठी आगामी काळात गावातील सर्वपक्षीय नेतेमंडळींनी अशा अस्थायिक मतदारांसाठी आर्थिक भुर्दंड सोसण्यापेक्षा सर्वांनी मिळून ही मतदार यादीतील नावे काढून टाकणे गरजेचे बनले आहे. भले मतदार संख्या कमी प्रमाणात असली तरी चालेल पण ज्यांना या गावाविषयी काहीएक सहानुभूती नाही अशांमुळे आर्थिक गणित कोलमडून जात असतात.निदान पुढील २०३० च्या निवडणुकीपूर्वीच अस्थायिक मतदारांची नावे काढून टाकण्यात यावी अशी मागणी स्थानिक सुज्ञ मतदार करत आहेत.

# स्व. बाबूराव भोनकर उद्यानाचे उद्घाटन

**माणगाव : बातमीदार**

कुणबी समाजाच्या कल्याणासाठी अखंड झटणारे, सहकार आणि शिक्षण क्षेत्रातून समाजपरिवर्तनाचे ध्येय जपणारे स्वर्गीय बाबूराव भोनकर हे आमच्या सर्वांच्या मनात आजही जिवंत आहेत. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आपण सर्वांनी रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत 'घड्याळाचे बटन दाबून' राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करून त्यांना खरी श्रद्धांजली अर्पण करावी, अशी भावनिक साद खासदार सुनील तटकरे यांनी दिली.



माणगाव तालुक्यातील साले गाव येथे नव्याने साकारण्यात आलेल्या आणि सुशोभीकरण झालेल्या 'बाबूराव भोनकर उद्यानाचे' उद्घाटन खासदार तटकरे यांच्या हस्ते शनिवार दि. २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी करण्यात आले. या वेळी परिसरात मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते ड. राजीव साबळे, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुका अध्यक्ष काका नवगणे, महादेव बक्कम, संगिता बक्कम, सायली दळवी, गजानन अधिकारी, रमेश मोरे, शादाब गैबी, चंद्रशेखर देशमुख, शैलेश भोनकर, राजू शिर्के, नितीन खडतर, तसेच भोनकर परिवार, वरिष्ठ नेते आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

## राज्यातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा रौप्य महोत्सव

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रूपये प्रवेश फीसह १५ डिसेंबर २०२५ पर्यत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

# किल्ले पन्हळघरवर 'स्वराज्याचा मावळा प्रतिष्ठान' तर्फे दीपोत्सव

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील लोणेरे जवळ असलेला ऐतिहासिक किल्ले पन्हळघर दुर्ग या दुर्गावर स्वराज्याचा मावळा प्रतिष्ठान या संघटनेच्या वतीने यावर्षी भव्य दीपोत्सव व मशाल ज्योत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.गेल्या पाच वर्षांपासून 'मावळा स्वराज्याचा प्रतिष्ठान' किल्ल्याच्या संवर्धनाचे काम सातत्याने करत असून, आतापर्यंत एकूण दहा पाण्याची टाकी संस्थेने शोधून काढल्या आहेत. यापैकी सात टाक्यांतील गाळ साफसफाई पूर्ण झाली असून उर्वरित तीन टाक्यांवर लवकरच काम पूर्ण होणार आहे. किल्ल्यावरील अजूनही काही अवशेष शोधले जाण्याची शक्यता असल्याचे संस्थेच्या सदस्यांनी सांगितले.

संवर्धनाच्या या कार्याला एक नवी परंपरा जोडत, ता. २५ व २६ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रथमच गडावर दीपोत्सव आणि मशाल ज्योत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या दिव्यांच्या उजेडात आणि मशालींच्या प्रकाशात किल्ले पन्हळघर दुर्ग उजळून निघाला. गडावर उपस्थित सुमारे ५० ते ६० शिवभक्त मावळ्यांनी एक रात्र माझ्या राज्यासाठी या भावनेने दीपोत्सव साजरा केला.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ज्यांनी आर्थिक किंवा वस्तूरूपात मदत केली, त्या सर्वांचे 'मावळा स्वराज्याचा प्रतिष्ठान'च्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.या दीपोत्सवाने पन्हळघर दुर्गाचा इतिहास पुन्हा एकदा उजळला आणि स्वराज्याच्या मावळ्यांनी तो शौर्य, श्रद्धा आणि संस्कृतीचा दीप पुन्हा प्रज्वलित केला.



# दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवा देण्यासाठी महावितरण भांडुप परिमंडलात पुनर्रचना

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यासाठी व कर्मचाऱ्यांच्या कामाच्या पद्धतीत सुलभता आणण्यासाठी सध्या महावितरणमध्ये पुनर्रचना राबविण्यात आली आहे. सदर पुनर्रचनेमध्ये पनवेल शहर विभागात दोन नवीन उपविभाग तसेच नेरूळ, वाशी व वागळे इस्टेट ठाणे या विभागात प्रत्येकी एक असे एकूण पाच उपविभागाची निर्मिती करण्यात आली आहे. पुनर्रचनेची अंमलबजावणी भांडुप परिमंडल अंतर्गत पेण, ठाणे व वाशी या तिन्ही मंडळात करताना इतक्या सहजतने करावी कि ग्राहक सेवेवर याचा परिणाम होणार नाही याची काळजी घेण्याची सूचना भांडुप परिमंडलचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले आहे.

या प्रक्रियेचा उद्देश महावितरणमध्ये एक महत्त्वपूर्ण संघटनात्मक परिवर्तन घडवून आणणे आहे. तसेच, कमी वेळेत ग्राहक सेवांमध्ये कार्यक्षमता वाढवणे, जबाबदारी वाढवणे आणि सर्व स्तरांवर संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे आहे. या पुनर्रचनेमुळे कर्मचाऱ्यांचा फायदा असा आहे कि आता त्यांना एकच कामावर अधिक लक्ष देता येणार आहे कारण पुनर्रचने नंतर प्रत्येक कर्मचाऱ्याचे जबाबदारी अधिक स्पष्टपणे विभागलेली आहे जेणेकरून कामाची कार्यक्षमता सुधरेल व परिणामी ग्राहकांना चांगल्या सेवा मिळतील.

या पुनर्रचनेमुळे महसूल व देयकांच्या ग्राहकसेवेसाठी तसेच सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र उपविभाग कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना सरसकट सर्वच कामे एकाचवेळी करण्याऐवजी आता अधिक केंद्रीत (फोकस) पद्धतीने निश्चित केलेली निवडक कामे करता येईल.

कामाचे नियमानुसार तास निश्चित होतील व कामाचा ताण देखील कमी होणार आहे. कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होणार आहे.

# महिलेचा खून करणारा आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावात एका महिलेचा खून करून सोन्याचे दागिने घेऊन फरार झालेल्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांच्या महिला पथकाने जेरबंद केले आहे.

कुंडेवहाळ गावात एका महिलेचा गळा आवळुन खुन झाला असल्याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यास माहिती प्राप्त झाली होती. त्यावरुन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी तत्काळ या ठिकाणी जावुन खात्री केली असता एक महिला संगिता नामदेव म्हात्रे (वय ५५, रा. घर नं, ४७१, मु. पो. कुंडेवहाळ) या मयत अवस्थेत आढळुन आल्या. तसेच सदर ठिकाणी केलेल्या चौकशीमध्ये मयत महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागीने हे चोरी झाले असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन मयत महिलेचा मुलगा सवी नामदेव म्हात्रे (वय ३६) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन यातील मयत



महिलेचा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करण्याच्या उद्देशाने गळा दाबुन खुन केला असल्याची फिर्याद नोंद करून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हयाच्या घटनास्थळी कोणतेही सीसीटिव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने आरोपीताबाबत माहिती मिळवणे अत्यंत अवघड जात होते. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हयाच्या तपासकामीं वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. त्याप्रमाणे घटनास्थळ परिसरातील रहिवाश्यांकडे चौकशी करण्याची कामगिरी महिला सपोनि प्रज्ञा मुंढे, सपोनि सारिका झांझुणें, पोउपनि प्रियांका शिंदे व महिला अंमलदार, पोशि विशाल दुधे यांना देण्यात आली होती. महिला पथकाने व पोशि विशाल दुधे यांनी अत्यंत कौशल्यपुर्ण परिसरातील सुमारे ३० महिला व पुरुष यांच्याकडे तपास केला. त्यामध्ये मोहंम्मद समीर अल्लाउद्दीन अन्सारी (वय २३ वर्षे, रा-कुंडेवहाळ) याच्याकडे केलेल्या तपासादरम्यान त्याने यातील मयत महिलेस ४० हजार रुपये उसने दिले होते.

आरोपीताने रक्कम परत मिळणेकरीता मयत महिलेकडे वारंवार मागणी केली होती. तसेच दिलेली रक्कम परत मागण्याकरीता मयत महिलेच्या घरी गेला असता मयत महिलेने पैसे परत करण्यासाठी नकार दिला. त्यामुळे आरोपीताने जाणीवपुर्वक मयत महिलेचा गळा आवळुन खुन केला असल्याचे सांगितले. खुनाच्या गुन्हयातील आरोपीताबाबत कोणत्याही प्रकारची माहीती नसताना महिला पोलीस पथकाने सखोल तपास करून, तांत्रीक तपासाच्या आधारे आरोपीताचे नांव निष्पन्न करून, कौशल्यपुर्ण तपास करुन त्यास अटक उल्लेखणीय कामगिरी केलेली आहे.

# पनवेलमध्ये सिलेंडरला लागलेली आग वेळीच विझवली; अनर्थ टळला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी परिसरात सकाळी सिलेंडरला लागलेल्या आगीमुळे मोठी खळबळ उडाली. सुदैवाने, अग्निशमन दलाने योग्य वेळी घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

ही माहिती मिळताच माजी नगरसेविका दर्शन भोंईर यांनी महापालिकेच्या अग्निशमन दलाला तत्काळ कळविले. त्यानंतर अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग विजवली. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गॅस सिलेंडरमधून



झालेल्या गळतीमुळे ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग शेजारील घरांपर्यंत पसरली नाही.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनीही तातडीने मदतीला धाव घेतली. या वेळी राजू कोळी, हसन बागवान, रोशन जाधव, चंद्रकांत जगे आणि इतर नागरिक घटनास्थळी उपस्थित होते. पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी परिसरात सुरक्षेचे उपाय वाढवले जाणार आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

# आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सवाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगरी संस्कृतीचा वारसा आणि परंपरा जपत दरवर्षी साजरा होणारा आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव यावर्षी १४व्या वर्षात पदार्पण करत आहे. संगीत, नृत्य, संस्कृती आणि उत्साह यांचा अनोखा संगम घडवणारा हा महोत्सव येत्या ७ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२५दरम्यान मोठ्या उत्साहात होणार आहे.

हा महोत्सव झेंडा सामाजिक संस्था यांच्या वतीने, कैलासवासी बळीरामराव पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा होणार असून, कामोठे परिसरात सांस्कृतिक उर्जा आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण होणार आहे.

महोत्सवासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक कला, लोकनृत्य, नाट्यप्रयोग आणि संगीत सादरीकरण या माध्यमातून स्थानिक कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या भव्य कार्यक्रमासाठी ऑडिशन २ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. इच्छुक कलावंतांनी या ऑडिशनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष जय पावणेकर यांनी केले आहे.



**पनवेल : दिवाळी सणाचे औचित्य साधून पत्रकार साबीर शेख यांनी सामान्य नागरिक आणि पत्रकार रुपाली शिंदे यांनी सत्यावार्ता हा दिवाळी अंक प्रकाशित केला आहे. या दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि खासदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी झाले. या वेळी शैलेश भगत, पत्रकार साबीर शेख, रूपाली शिंदे, रेश्मा जगताप, स्नेहा धुमाळ यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

# पाण्याच्या निचऱ्याबाबत उपाययोजनेची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर-१३ मधील होल्डींग पॉडची खोली वाढविणे व गाढी नदीवर नवीन बंधारा बांधण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे यांनी पनवेल मनपा आयुक्तांना निवेदनद्वारे केली.



निवेदनात म्हटले आहे की, नवीन पनवेल सेक्टर १३ (पूर्व) येथे पावसाळ्यात पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे रहिवाश्यांच्या घरामध्ये पाणी शिरते. ही समस्या सोडविण्यासाठी कायम स्वरुपी उपायोजना करणे गरजेचे आहे. या होल्डींग पॉडची खोली वाढविणे व पुनर्बांधकाम करण्यात यावे. तसेच त्यांची खोली वाढविण्यात यावी. यासोबतच गाढी नदीवर सिडकोमार्फत बांधण्यात आलेला बंधारा, नवीन बांधण्यात यावा.

# खासदार निलेश लंके यांनी घेतली लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यासह पनवेल, उरण आणि इतर विभागाचा चेहरामोहरा विकासाच्या माध्यमातून बदलण्याचे कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले असून, रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार खासदार निलेश लंके यांनी काढले. खासदार निलेश लंके यांनी मंगळवारी पनवेल येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान दोघांमध्ये सामाजिक, शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या वेळी खासदार निलेश लंके यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या समाजकार्यातील योगदानाचा उल्लेख करत त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.

# उरण येथे छटपूजा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरण येथे सोमवारी सायंकाळी ठीक-ठिकाणी छट पूजेचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारीदेखील सकाळी ६ वाजता पूजेचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर भारतीय, बिहारी नागरिक छट पूजा करीत असतात. उगवत्या सुर्याची व मावळत्या सुर्याची पूजा केली जाते, असे राकेश रंजन यांनी सांगितले.

उरण नगर परिषदचे विमला तलाव, पिरवाडी बिच, नेव्ही येथील पिन बिच येथे छट पूजेचे आयोजन करण्यात आले. उत्तर प्रदेश, बिहार येथील उरण येथे राहणारे रहिवासी विशेष महिला वर्ग मोठ्या प्रमाणात सूर्य देवाची पूजा करीत असतांना दिसत होते.

पिरवाडी बीच येथे छट पूजा पूजा समिती यांच्या वतीने पूजेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्ष मेघनाथ विश्वकर्मा व कैलाश शर्मा यांनी सांगितले. त्याच प्रमाणे गौरव कुमार, मंजू राकेश कुमार, हेमांश पांडे, रघुनाथ पांडे, रणजीत वर्मा, सोनू मिश्रा व उत्तर भारतीय रहिवासी उपस्थित होते.



# विवेक पाटील यांना पुरस्कार

**उरण : बातमीदार**

शिवप्रतिष्ठान पुणे यांच्या तर्फे आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज रत्न पुरस्कार सोहळा आळंदी येथे मोठया उत्साहात संपन्न झाला. या वेळी कला व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल उरण तालुक्यातील पागोटे गावचे सुपुत्र उत्तम कलाकार, उत्तम सूत्रसंचालक विवेक चंद्रकांत पाटील यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज रत्न पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



विवेक पाटील यांच्या समवेत धुतुम गावचे उरण व रायगड जिल्ह्यातील निवेदक सूत्रसंचालक समाजसेवक प्रकाश ठाकूर हेसुद्धा या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते.

# अनुकंपा धोरणांतर्गत योगेश कवठेंना कनिष्ठ अभियंता पदाचे नियुक्तीपत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मयत झालेले प्रभाग अधिकारी सदाशिव राम कवठे यांचा वारस-मुलगा योगेश सदाशिव कवठे यांची अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार कनिष्ठ अभियंता (हार्डवेअर/नेटवर्कींग) या मंजूर व रिक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी या पदासाठीचे नियुक्तीपत्र योगेश कवठे यांना देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राज्य शासनाकडून आलेल्या ९ जून २०२५च्या परिपत्रकानुसार सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना प्राप्त आहेत. यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेप्रमाणे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता पनवेल महानगरपालिका प्रयत्नशील आहे. याचाच भाग म्हणून अनुकंपा नियुक्ती प्राधान्याने पूर्ण करण्यात आली आहे. महापालिका



स्थापनेपासून वेगवेगळ्या संवर्गातील एकूण २९ कर्मचाऱ्यांना पालिकेकडून अनुकंपा तत्वानुसार नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

पनवेल महापालिकेत अधीक्षक पदावर-प्रभाग अधिकारी म्हणून कार्यरत सदाशिव कवठे यांचे महापालिकेतील कार्य उल्लेखनीय होते. त्यांचे योगदान लक्षात घेता मृत्यूनंतर त्यांच्या अभियंता असलेल्या वारस मुलास अवघ्या चार महिन्यांत अनुकंपा नियुक्तीच्या सर्वसाधारण सुधारित धोरणानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करून नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. या वेळी परिवहन व्यवस्थापक तथा उपायुक्त (मुख्यालय) कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, आस्थापना विभागप्रमुख कीर्ती महाजन उपस्थित होते.

# पनवेल परिसरात उत्तर भारतीय समाजातर्फे छटपूजा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड, येथे सोमवारी छटपूजेचा पावन सोहळा मोठ्या श्रद्धा, भक्तीभावाने आणि उत्साहात पार पडला. भारती सामाजिक संस्था आणि उत्तर भारतीय समाजाच्या वतीने या पारंपरिक उत्सवाचे आयोजन उलवे शहरात करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती होती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित भाविकांना शुभेच्छा देत छठ पूजेचे सांस्कृतिक व धार्मिक महत्त्व अधोरेखित केले. उत्तर भारतीय बांधवांमध्ये एकोपा व ऐक्याची भावना या सणाद्वारे अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी या वेळी नमूद केले.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच




अमर म्हात्रे, अॅड. योगिता भगत, निलेश खारकर, मदन पाटील, धीरज ओवळेकर, अवधेश महतो, राजीव रंजन, विकास सिंह, सागरकुमार रंधवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उलवे शहरातील कोपर गाव, तलाव, सेक्टर-९, येथे भक्तीमय वातावरणात भाविकांनी सूर्य देवतेला अर्घ्य अर्पण केले. पारंपरिक गीते, सांस्कृतिक कार्यक्रम व सणासुदीचे वातावरण यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी रंग चढला होता.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उत्तर भारतीय बांधवांचा छटपूजा उत्सव करंजाडे परिसरामध्ये मोठ्या उत्साहात झाला. या उत्सवाला भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, सरपंच मंगेश शेलार, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या.

स्थानिकांनी पारंपारिक विधीनुसार विशेष घाट आणि स्वच्छतेची उत्तम व्यवस्था केली असून हजारो उत्तर भारतीय महिलांनी पारंपारिक वेशभूषा करून सूर्यदेवाची पूजा केली.

या वेळी उपसरपंच सागर आंग्रे, ग्रामपंचायत सदस्य सुरज शेलार, सुनील भोईर, तुषार नागे, नंदू भोईर, सुरज गुप्ता, नाथाभाई भरवाड, विनोद सिरवी, प्रथमेश पुंडे, बोस पिल्लई अण्णा, रश्मी गुप्ता, कांता गायकवाड आदी उपस्थित होते.






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छटपूजेचा भव्य सोहळा यंदा रोडपाली कळंबोली परिसरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सूर्योपासना महापर्व उत्सव मंडळ यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या पावन सोहळ्यात विविध समाजघटक, भक्तगण व सामाजिक संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला. पूजेच्या वेळी घाट परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. शंखनाद, भजन, पारंपरिक गीत आणि आरत्या यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. विशेष म्हणजे, भारतीय जनता पार्टी कळंबोली मंडळ यांच्या वतीने छटव्रती महिलांना आणि भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.




या वेळी कळंबोली शहर मंडल अध्यक्ष अमर पाटील, जिल्हा चिटणीस रवी पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, रवी भगत, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, सरस्वती कथारा, मनिषा निकम, बायजा बारगजे, दुर्गा साहनी, मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, अमर ठाकूर, राजेंद्र बागल, केशव यादव, सुरेंद्र बेनिवाल आणि छठ समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छटपूजेचा हा पारंपरिक व सांस्कृतिक उत्सव सुसंस्कार, एकता आणि श्रद्धेचे प्रतीक मानला जातो. रोडपाली कळंबोली परिसरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर हा उत्सव साजरा होतो. यंदाही भक्तांनी सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करत आरोग्य, समृद्धी आणि सुख-शांतीची प्रार्थना केली. या वेळी भाविकांसाठी मंडळाकडून विविध सोयीसुविधा पुरवण्यात आल्या होत्या.

भक्ती, उत्साह आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा छटपूजेचा सोहळा यंदाही यशस्वीपणे पार पडल्याने आयोजकांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.


## संपादकीय

# सहकार्याचा नवा अध्याय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत-आसिआन भागिदारी केवळ व्यापारी स्वरुपाची नसून सांस्कृतिक असल्याचे अधोरेखित केले ते योग्यच होते. भारताची आसिआन देशांशी हजारो वर्षांची व्यापारी आणि सागरी संबंधांचीही परंपरा आहे. त्यातच आजच्या बदललेल्या जागतिक परिस्थितीत २०२६ हे वर्ष भारत-आसिआन सागरी सहकार्याचे वर्ष म्हणून ओळखले जाईल असे पंतप्रधान मोदी यांनी जाहीर केले आहे.

**भारत-आसिआन देश यांच्यातील भागिदारीला हजारो वर्षांचा सांस्कृतिक आणि व्यापारी इतिहास आहे हे खरेच. पण सध्या चीनची वाढती दादागिरी आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेचे बेभरवशाचे झालेले पाठबळ यामुळे आसिआन देश भारताकडे अपेक्षेने पाहात आहेत. या बदलांच्या पार्श्वभूमीवर भारत-आसिआन भागीदारीचे स्वरूप बदलणे स्वाभाविक म्हटले जाते आहे. इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, फिलिपिन्स, व्हिएतनाम, कम्बोडिया, लाओस, ब्रुनेई, म्यानमार या दहा देशांसोबतच आता पूर्व तिमूर या अकराव्या देशाचाही आसिआनमध्ये समावेश झाला असून आग्नेय आशियाई देशांचा हा मुक्त व्यापारासाठीचा प्रादेशिक संघ म्हणजेच आसिआन होय. भारताची आसिआन देशांशी सांस्कृतिक संबंधांखेरीज व्यापारी आणि सागरी संबंधांचीही ऐतिहासिक परंपरा आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार पहिल्यांदा सत्तेवर आले तेव्हाच 'लुक ईस्ट-क्ट ईस्ट' अर्थात 'पूर्वाभिमुखता'हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया असेल असे जाहीर करण्यात आले. या संपूर्ण प्रदेशावर चीनचा आर्थिक व व्यापारी प्रभाव आहे. परंतु चीनने दक्षिणेकडील समुद्रात वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केल्याने या देशांना संरक्षक पाठबळाची गरज जाणवू लागली. आधी त्यांच्या हाकेला अमेरिका धावून जात असे. परंतु राष्ट्राध्यक्ष पदी डोनाल्ड ट्रम्प आल्यापासून अमेरिकेकडून मदत मिळेलच याचा भरवसा आसिआन देशांना उरलेला नाही. नुकत्याच क्वालालुम्पुर येथे पार पडलेल्या आसिआन परिषदेला ट्रम्प प्रत्यक्ष उपस्थित राहिले. परंतु स्वत:च्या देशाच्या व्यापारी हेतूंचा पाठपुरावा करण्यापलीकडे त्यांनी अन्य बाबींकडे लक्ष दिले नाही. अमेरिकेचा आधार वाटेनासा झाल्यामुळे आसिआन देशांपैकी काही देश आता भारताकडे अपेक्षेने पाहू लागले आहेत. फिलिपिन्स आणि इंडोनेशिया यांनी भारताशी सामरिक भागीदारीविषयी चर्चाही सुरू केली आहे. आसिआन देश हे भारतासाठी महत्त्वाचे व्यापार भागीदार देश राहिले असून भारताच्या एकूण विदेशी व्यापारात आसिआनचा वाटा सुमारे ११ टक्के इतका आहे. आज अमेरिकेसारखी बलाढ्य बाजारपेठ भारतीय मालासाठी अडथळे निर्माण करत असताना भारताला अन्य मोठ्या बाजारपेठांकडे वळावेच लागणार आहे. यात ब्रिटन, युरोपीय समुदाय, ऑस्ट्रेलियासोबतच आसिआनचाही समावेश करावा लागणार आहे. चीनवर अनाठायी अवलंबून राहणेही त्यामुळे भारताला टाळता येईल. भारताला विश्वसनीय पुरवठा साखळी तयार करण्याची गरजही आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसिआन देशांसोबत सहकार्याचा नवा अध्याय सुरू केल्याचे घोषित केले आहे हे अतिशय योग्यच म्हणावे लागेल. त्याशिवाय यातून भारताच्या नौदल आणि पायाभूत सुविधांच्या वृद्धीस आणखी चालना मिळणार आहे. आसिआन देशांना भारताविषयी आस्था आणि विश्वास वाटतो कारण भारताने कधीही या प्रदेशावर वर्चस्व गाजवण्याची वृत्ती दाखवलेली नाही. याउलट चीन आणि अमेरिका यांच्यातील सत्तासंघर्षात आसिआन देशांना नेहमीच असुरक्षित वाटत आले आहे. त्यामुळेच २०२६ हे सागरी सहकार्य वर्ष घोषित करून भारताने सामरिक भागीदारालाही अधिकृत रूप दिले ही आजच्या काळाची गरजच म्हटले पाहिजे.**

# वैद्यकीय संशोधक वसंत रामजी खानोलकर



भारतातील वैद्यकीय संशोधनाचा पाया घालणारे व्यक्तिमत्व म्हणून वसंत रामजी खानोलकर यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचा कोकणातील एका छोट्या खेडेगावात गोमंतक मराठा समाजातील सुशिक्षित कुटुंबात १३ एप्रिल १८९५ रोजी झाला.

वसंत खानोलकर यांचे वडील रामजी धोंडो खानोलकर एक प्रतिष्ठित शल्यचिकित्सक होते. कंदाहारला गेलेल्या लॉर्ड रॉबर्टच्या विजयी सैन्यासोबत परतताना क्वेट्टा येथे ते विश्रांतीसाठी थांबले. तेव्हा क्वेट्टाचे वातावरण आणि परिसर रामजींना एवढे आवडले की त्यांनी तेथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. दुर्दैवाने १९३५च्या भयानक भूकंपात रामजी आणि त्यांच्या परिवारातील १४ जण मृत्युमुखी पडले. रामजींचा वैद्यकीय वृत्तीसोबतच संस्कृत भाषेचा गाढा अभ्यास होता. त्यांच्याकडे अनेक मूल्यवान आणि दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह होता. बहुधा वसंत खानोलकरांना वैद्यक आणि भाषा या विषयांची आवड वडिलांकडूनच मिळाली असावी.

वसंत खानोलकरांनी लहानपणीच डॉक्टर व्हायचे ठरवले होते. वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी मुंबईच्या ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. येथेच ते सी.जी. पंडित यांना पहिल्यांदा भेटले. त्याच वर्षी ते इंग्लंडला रवाना झाले. लंडन विद्यापीठातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी संपादन केली आणि १९१८मध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. १९२३मध्ये ते रोगनिदानशास्त्रात (पॅथॉलॉजी) एमडी झाले. या काळात त्यांनी मूलभूत विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात अमूल्य अनुभव मिळवला.

ते सर्वात कमी वयाचे ग्रॅहम रिसर्च स्कॉलर होते. भारतात परत येऊन ते ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना रोगनिदानशास्त्र शिकवू लागले. शिक्षणासाठी उपयुक्त विविध नमुन्यांचे संग्रहालय त्यांनी सुरू केले. रोगनिदानशास्त्राच्या पद्धतशीर शिक्षणाची सुरुवात त्यांनी केली. रोगनिदानशास्त्रातील संशोधनावरही त्यांनी विशेष भर दिला. पाश्चात्य देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या तुलनेत भारतीय शिक्षण कमी पडू नये म्हणून त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमात अनेक बदल सुचवले. वैद्यकीय शिक्षणामध्ये मूलभूत विज्ञान, प्रायोगिक जीवशास्त्र (एक्सपेरिमेंटल बायोलॉजी), जीवरसायनशास्त्र, जीवभौतिकशास्त्र तसेच संख्याशास्त्र यांचे महत्त्वाचे स्थान त्यांनी ओळखले होते. हे तत्त्वज्ञान त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये पसरविण्याचा प्रयत्न केला. खानोलकरांनी रोगनिदानशास्त्राचे शिक्षक या नात्याने या विषयाच्या अभ्यासाला त्यांनी नवीन दिशा दिली.

खानोलकरांनी सेठ जी.एस. मेडिकल महाविद्यालय व केईएम रुग्णालयात कामाच्या एका वेगळ्या परंपरेची सुरुवात केली. त्यामुळे या संस्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर एक अत्युत्तम वैद्यकीय संस्था असण्याचा मान मिळाला. जैवभौतिकी, उपयोजित जीवशास्त्र इत्यादी विषयांची सुरुवात त्यांनी मुंबई विद्यपीठात केली.

या कालावधीत खानोलकरांना कर्करोग आणि कुष्ठरोग यांच्या अभ्यासामध्ये विशेष कुतूहल व आवड निर्माण झाली. तेव्हा त्यांनी शिक्षकी पेशातून अंग काढून घेतले आणि टाटा मेमोरियल रुग्णालयात प्रमुख रोगनिदानतज्ञ म्हणून १९४१मध्ये ते रुजू झाले. त्यांनी कर्करोग, कुष्ठरोग, पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र, मानवी अनुवंशशास्त्र या विषयात संशोधन केले.

खानोलकर १९४१-१९५१ या काळात टाटा मेमोरियल रुग्णालयात अर्बुदाच्या (ट्युमर) तपासणीच्या कामात व्यस्त राहिले. त्यांच्या संशोधनाचा विषय भारतातील कर्करोग हा होता. भारतात कर्करोग आहे का, त्याचे कोणते प्रमुख प्रकार आहेत, हे शोधण्यासाठी त्यांनी रुग्णालयातील आकडेवारीचा अभ्यास केला. कर्करोगासाठी कारणीभूत काही घटक/सवयी, रोगपरिस्थितीविज्ञान (एपिडेमियॉलॉजी) यांचा त्यांनी अभ्यास केला. या संदर्भातील त्यांचे शोधनिबंध अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले. भारतातील कर्करोगासंदर्भातील त्यांच्या अग्रगण्य कामाबद्दल त्यांना १९४७मध्ये आंतरराष्ट्रीय कर्करोग युनियनचे (इंटरनॅशनल युनियन अगेन्स्ट कॅन्सर) सदस्यत्व बहाल करण्यात आले.

कर्करोगावर संशोधन करण्यासाठी भारतामध्ये तंत्रज्ञान आणि साधनसामग्री उपलब्ध व्हावी यासाठी त्यांनी केलेल्या मागणीचे मूल्यमापन एका खास सरकारी समितीने केले. या कामासाठी अमेरिकेहून इ. व्ही. कॉद्रे यांनाही बोलावण्यात आले होते. सर्वानुमते खानोलकरांना संशोधनासाठी एक राष्ट्रीय प्रयोगशाळा देण्यात यावी असे ठरले. अखेर १९५२मध्ये इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटर (आयसीआरसी) सुरू करण्यात आले. यासाठी अनेक जागतिक संस्थांचे आर्थिक पाठबळ मिळाले, त्यात रॉकफेलर फाउंडेशन, जागतिक आरोग्य संघटना होत्या.

कर्करोगाव्यतिरिक्त खानोलकरांनी कुष्ठरोगावरही संशोधन केले. पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र यावर कार्य करण्यामध्ये खानोलकरांचा भर होता. खानोलकर अनेक भाषा पारंगत होते. सहा भारतीय आणि चार युरोपियन भाषा ते बोलू आणि वाचू शकत होते.

भारत सरकारने खानोलकरांना पद्मभूषण देऊन गौरविले. ते इंडियन सोसिएशन ऑफ पॅथॉलॉजी अँड मायक्रोबायोलॉजी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, इंटरनॅशनल कॅन्सर रिसर्च कमिशनचे अध्यक्ष, इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटरचे निदेशक, कर्करोग आणि कुष्ठरोगावरील जागतिक आरोग्य संघटनेच्या समितीचे सदस्य आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते. नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेसने खानोलकरांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वक्तृत्व स्पर्धा सुरू केली. कर्करोग आणि कुष्ठरोग यावर त्यांनी तीन पुस्तके आणि शंभरहून जास्त शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. खानोलाकारांचा मृत्यू मुंबईच्या केईएम रुग्णालयात २९ ऑक्टोबर, १९७८ रोजी झाला.

**-रजनी भिसे (मराठी विश्वकोष)**

# साहित्यिक व पटकथा लेखक प्रभाकर तामणे



प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांनी चित्रपटसृष्टीला एकापेक्षा एक हिट गाणी दिली आहेत. अनुराधा पौडवाल यांचा जन्म २७ ऑक्टोबर १९५२ रोजी झाला. अनुराधा पौडवाल संगीतविश्वातील एक मोठे नाव आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्या चित्रपटातील गाण्यापासून दूर आहे. आपल्या गोड आवाजाने चाहत्यांच्या हृदयात स्थान निर्माण करणाऱ्या अनुराधा पौडवाल यांच्याशी संबंधित काही खास गोष्टी आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

अनुराधा पौडवाल यांचे बालपण मुंबईत गेले. सुरुवातीपासूनच त्यांचा चित्रपट आणि संगीताकडे कल होता. अनुराधा पौडवाल यांनी १९७३ मध्ये आलेल्या 'अभिमान' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि जया भादुरी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटात अनुराधा पौडवाल यांनी जया बच्चन यांच्यासाठी एक श्लोक गीत गायले होते. यानंतर अनुराधा पौडवाल यांनी १९७६ मध्ये 'कालीचरण' या चित्रपटात गाणे गायले. 'आप बीती' या चित्रपटातून त्यांनी एकल गाण्यास सुरुवात केली. चित्रपटाचे संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी दिले होते. चित्रपटांमध्ये गाण्यासोबतच त्या स्टेज शोही करत असत. किशोर कुमार यांच्यासोबत त्यांनी जवळपास ३०० स्टेज शो केले.

अनुराधा पौडवाल यांनी अरुण पौडवाल यांच्याशी लग्न केले जे स्वतः संगीतकार होते. अरुण पौडवाल यांच्या अकाली निधनाने त्या खूप दु:खी झाल्या होत्या. टी-सीरिजच्या सहकार्याने त्या फक्त एक-दोन गाणी गात राहिल्या. अनुराधा पौडवाल यांना आदित्य आणि कविता ही दोन मुले होत. आदित्यचा मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे मृत्यू झाला.

अनुराधा यांनी मधुर आवाजात अनेक हिट चित्रपट दिले. संगीत क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना २०१७मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# ॲपलच्या नवीन आयफोनवर डिस्काउंट

आय फोन १७ वर भरघोस सूट, पहिल्यांदाच ॲपलच्या नवीन आयफोनवर धमाका डिस्काउंट जाणून घ्या काय आहेत डील्स अगदी वेगळ्या आणि आकर्षक रंगामुळे आणि नवीन कॅमेरा सिस्टिममुळे आयफोन १७ प्रो आणि प्रो मॅक्स आकर्षक ठरले आहेत.ॲपलचा प्रिमियम आयफोन १७ प्रो खूपच लोकप्रिय झाला आहे. त्यातही तुमचं बजेट जास्त असेल तर हा आयफोन म्हणजे उत्तम पर्याय आहे. अगदी वेगळ्या आणि आकर्षक रंगामुळे आणि नवीन कॅमेरा सिस्टिममुळे आयफोन १७ प्रो आणि प्रो मॅक्स आकर्षक ठरले आहेत. असं असताना हा नवीन आयफोन अद्याप ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर मोठ्या डिस्काउंटसह उपलब्ध नाही. तेव्हा काही बँका यावर्षी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आयफोन १७ प्रोवर मोठ्या सवलती देत आहेत.



दिवाळीच्या खरेदीचा हंगाम संपला असला तरी, विजय सेल्स आता भागीदार बँकांकडून १० हजार रूपयांपर्यंतची सूट देत आहे. काही महिन्यांपूर्वी आयफोन १६ प्रो मॅक्सवर देण्यात आलेल्या मोठ्या सवलतींइतक्या या ऑफर महत्त्वाच्या नसल्या तरी किमतीतील कपात अनेक ग्राहकांना आकर्षित करत आहे.

आयफोन १७ प्रोची सुरूवातीची किंमत २५६ जीबी स्टोरेज असलेल्या बेस व्हेरिएंटची किंमत १,३४,९०० पासून सुरु होते. हा फोन डीप ब्लू, कॉस्मिक ऑरेंज आणि सिल्व्हर रंगांमध्ये उपलब्ध आहे. विविध बँकांच्या क्रेडिट कार्डसह हे डिव्हाइस सवलतीत उपलब्ध आहे.

आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्ड नॉन-ईएमआय व्यवहारांवर ५००० रूपयांची सूट दिली जात आहे.एसबीआय बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या क्रेडिटद्वारे नो-कॉस्ट ईएमआय व्यवहार निवडल्यास ४००० रूपयांची सूट मिळू शकते.

आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्ड ईएमआयद्वारे आयफोन १७ प्रो खरेदी केल्यास ५ टक्के म्हणजेच १० हजारांपर्यंत सूट मिळेल.जर तुमच्याकडे संबंधित बँक कार्ड असतील, तर तुम्ही आता आयफोन १७ प्रो १,२४,९९० मध्ये खरेदी करू शकता. शिवाय, जर तुम्ही एक्सचेंज ऑफरचा पर्याय निवडलात किंवा तुमचा जुना फोन थर्ड पार्टी रिसेलरद्वारे विकलात तर तुम्ही तुमची एकूण किंमत आणखी कमी करू शकता

# जागतिक स्ट्रोक दिवस

स्ट्रोकचे गंभीर स्वरूप आणि उच्च दर यावर जोर देण्यासाठी दरवर्षी २९ ऑक्टोबर रोजी जागतिक स्ट्रोक दिवस पाळला जातो. स्ट्रोकच्या प्रतिबंध आणि उपचारांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठीदेखील हा दिवस पाळला जातो.

जगभरात, ब्रेन स्ट्रोक हे मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आणि अपंगत्वाचे तिसरे प्रमुख कारण आणि मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आहे. दरवर्षी अंदाजे १८ लाख लोकांना पक्षाघाताचा त्रास होतो. असे नमूद केले आहे की, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये, ज्यात भारताचा एक भाग आहे, स्ट्रोकमध्ये १०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे, तर विकसित देशांमध्ये ४२ टक्क्यांनी घट झाली आहे.

भारतातील स्ट्रोकचे सरासरी प्रमाण दर एक लाख लोकसंख्येमागे १४५ आहे. संशोधकांच्या मते, दर मिनिटाला तीन भारतीयांना पक्षाघाताचा झटका येतो. जरी वयोवृद्ध वयोगटातील लोकांना ब्रेन स्ट्रोकचा जास्त त्रास होत असला तरी, तो कोणत्याही वयात कोणालाही होऊ शकतो. जोखीम घटक समजून घेणे आणि लक्षणे ओळखणे ब्रेन स्ट्रोक टाळण्यास मदत करू शकते. त्याच वेळी लवकर निदान आणि उपचार मिळाल्याने पूर्ण बरे होण्याची शक्यता वाढते.



**निमित्त**

जागतिक स्ट्रोक दिवसाची स्थापना २९ ऑक्टोबर २००४ रोजी कॅनडातील व्हँकुव्हर येथील वर्ल्ड स्ट्रोक काँग्रेसमध्ये करण्यात आली. नंतर २००६मध्ये जनजागृतीसाठी हा दिवस घोषित करण्यात आला. वर्ल्ड स्ट्रोक फेडरेशन आणि इंटरनॅशनल स्ट्रोक सोसायटीच्या विलीनीकरणासह जागतिक स्ट्रोक संघटना तयार करण्यात आली. तेव्हापासून, वर्ल्ड स्ट्रोक ऑर्गनायझेशन वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर जागतिक स्ट्रोक डेच्या व्यवस्थापनाची आणि समर्थनाची काळजी घेत आहे.

जगभरातील स्ट्रोक डेटाच्या प्रगतीमुळे १९९०च्या दशकात जागतिक स्ट्रोक दिनाचा आग्रह अस्तित्वात आला. २०१०मध्ये जागतिक स्ट्रोक ऑर्गनायझेशनने जागरुकतेच्या अभावामुळे आणि प्रत्येकासाठी निदान आणि उपचारांची योग्य उपलब्धता नसल्यामुळे प्रचलित मृत्यू आणि अपंगत्व रोखण्यासाठी स्ट्रोकला सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केले. २०१६मध्ये, स्ट्रोकमुळे ११ कोटी ६० लाख संभाव्य वर्षांचे जीवन मृत्यू आणि अपंगत्वामुळे गमावले गेले.

या वर्षी जागतिक स्ट्रोक दिनाची थीम GreaterThanStroke सक्रिय आव्हान आहे. ही थीम स्ट्रोकबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि स्ट्रोक प्रतिबंध आणि पुनर्वसनावर कारवाई करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी खेळाच्या भावनिक शक्तीचा लाभ घेते. खेळाला सार्वत्रिक आकर्षण आहे जे भौगोलिक, सांस्कृतिक आणि लोकसंख्याशास्त्रीय सीमांच्या पलीकडे आहे. सर्व स्तरातील लोक कोणत्या ना कोणत्या स्वरुपात खेळात गुंतलेले असतात. जागरुकतेसाठी एक व्यासपीठ म्हणून खेळाचा फायदा घेऊन, आम्हाला विश्वास आहे की संदेश व्यापक आणि वैविध्यपूर्ण प्रेक्षकांपर्यंत पोहचेल. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## नियमित दोन किमी वेगाने चालणे आरोग्यास फायदेशीर

वेगाने चालणे हा व्यायाम सहज करता येण्यासारखा आहे. वेगाने चालण्याचे अनेक फायदे आहेत. तुमच्या दैनंदिन दिनचर्येमध्ये दोन किलोमीटर वेगाने चालणे समाविष्ट केल्यास तुमचे आरोग्य लक्षणीयरीत्या सुधारू शकते, परंतु योग्य तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव महत्त्वाची आहे.



डॉ. सुरेंद्र पाल सिंग यांनी सांगितले की, नियमित वेगात चालणे हे सर्वांगीण आरोग्याला चालना देण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. आपण दररोज अशी कृती केल्यास त्याचा आपल्या शरीरावर कसा परिणाम होतो ते जाणून घेऊ.

हृदय व श्वासोच्छ्वासाला चालना : वेगाने चालण्यामुळे तुमचे हृदय आणि फुप्फुसे मजबूत होतात. त्यांची कार्यक्षमता सुधारणे आणि तुमच्या कार्य करण्याची क्षमता वाढवण्याला त्यामुळे चालना मिळते.

रक्तदाब नियमन : या व्यायाम प्रकारामुळे रक्तदाबावर नियंत्रण राहते आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

सांध्यांची लवचिकता सुधारते : वेगात चालण्याने तुमच्या सांध्यांची लवचिकता सुधारून, कडकपणा कमी होतो.

मधुमेह व्यवस्थापन : वेगात चालण्याच्या कृतीने रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत मिळते. मधुमेहींसाठी ही बाब स्वाभाविकत: फायदेशीर ठरते.

वजन व्यवस्थापन चमत्कार : कॅलरी बर्न करणे, वजन कमी करणे किंवा निरोगी वजन व्यवस्थापन यांसाठी वेगात चालण्यामुळे योगदान मिळेल.सर्वसाधारण शिफारस म्हणून डॉ. सिंग आठवड्यातून पाच वेळा ३० मिनिटे वेगाने चालण्याच्या आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यास सांगतात. हा कालावधी सामान्यत: चांगले आरोग्य राखणे व या व्यायामाचे फायदे मिळविणे यासाठी पुरेसा असतो.

वेगवान चालण्याने अनेक फायदे होत आहेत; परंतु जर तुम्ही योग्य प्रकारे चालत नसाल, तर त्याचे विचारात घेण्यासारखे संभाव्य तोटेही आहेत. तुमच्या क्षमतेपेक्षा तुम्ही अधिक वेगाने चालल्यास तुमच्या हृदयाची गती अधिक वाढू शकते. पोषक घटकांच्या अपुऱ्या सेवनामुळे तुम्हाला थकवा येऊ शकतो. जलद चालण्याची दिनचर्या सुरू करण्याआधी, विशेषत: जर तुम्हाला गंभीर संधिवात, हृदयाच्या समस्या किंवा शस्त्रक्रियेनंतर बरे होण्याच्या मार्गावर असाल किंवा यांसारख्या आरोग्य स्थिती आधीपासूनच असतील, तर सुरक्षेबाबतच्या टिप्सचे पालन करा.

# रोहा तालुक्यात भाजपची ताकद वाढली; कामगार नेते संदेश बामणे यांचा पक्षात प्रवेश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कामगारांच्या हक्कासाठी झटणारे, सामाजिक क्षेत्रात सक्रिय आणि जनसंपर्कात दांडगा हात असलेले कामगार नेते संदेश बामणे यांनी अखेर भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला.

अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात खासदार तथा जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बामणे यांनी पक्षप्रवेश केला. या वेळी भाजपाचे माजी आमदार पंडित पाटील, जिल्हा नेते आस्वाद पाटील, रोहा



तालुका अध्यक्ष अमित घाग, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, तसेच युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नरेश कोकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.तर भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

संदेश बामणे यांनी अनेक वर्षांपासून धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी लढा दिला आहे. कामगारांच्या अडचणींना न्याय मिळवून देण्यासाठी ते सदैव पुढे सरसावले आहेत. त्यामुळेच ते कामगारांचा विश्वासू नेता म्हणून तालुक्यात परिचित आहेत. कामगार क्षेत्राबरोबरच बामणे यांनी क्रीडा क्षेत्रातही मोठे योगदान दिले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा तालुक्यातील कबड्डीपटू राज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले आहेत.

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **संजय नामदेव भोईर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३२४)**
**(ULPIN: २७१४४१२८२७९), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६५/४ | २ | ०.३६.०० पो.ख. ०.०४.८० | २.३७ |
| | | एकुण ०.४०.८० | |
| एकुण क्षेत्र ०.४०.८० गुंठयाचे खरेदीखत | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/१०/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड**
**कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कै. पोशा मंगळया पाटील व कै. शिवराम पोशा पाटील** यांचे कायदेशीर वारस **यादव शिवराम पाटील, राधा जगन्नाथ म्हात्रे, यमुना यशवंत पाटील, निर्मला जनार्दन पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३३९)**
**(PU-ID: १२४०५३९५२४९), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९३/२/अ खाते कमांक : १११६ | १ | ०.२०.२० पो.ख. ०.०१.३० | २.८७ |
| | | एकुण ०.२१.५० | |
| एकुण क्षेत्र ०.२१.५० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २९/१०/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड**
**कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड- ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहिलेला मालक/कब्जेदारांकडून आमचे अशील कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. सदर मालक / कब्जेदारांनी आमच्या अशिलांकडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नेरे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभग | भोगवटा वर्ग पध्दती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. दिनेश रामचंद्र भोईर श्री. वसीमराजा सलीम शेख | १३३ | १ | ०-४७- ७५ | ३.६१ |
| | पोट खराबा | | ०-२७-१० | |
| | एकुण मिळकत | | ०-७४-८५ | |
| **यापुढे या करारात संक्षिप्ततेसाठी 'सदरची मिळकत म्हणून संबोधले जाईल.** | | | | |

वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा, कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, कर्ज, बक्षीस, खरेदी, साठेकरार, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, दिवाणी दावा, महसूल वाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुराव्यांसह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदारांबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

वरील जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्यास आमची कोणाचेही कोणतीही हरकत नसून त्यास आमची पूर्ण परवानगी आहे.

**ठिकाण :**
**दिनांक: २७/१०/२०२५**

**sd/-**
**Sumant Y. Tawade**
Mob. No.9821282120/959489365 1/9082222586 Centurion Mall, 2nd Floor, Sector-19, Nerul (E), Navi Mumbai - 400706

# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३,
ता. अंबरनाथ जि.ठाणे. ई-मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/साबां/२२९६/२०२५ -२०२६** **दिनांक :- २८/१०/२०२५**

## जाहिर ई- निविदा सुचना क्र. ८५/२०२५-२६

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत नगरपरिषद हद्दीतील ०२ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २९/१०/२०२५ ते दि. ०५/११/२०२५ रोजी दुपारी.१२.०० वाजेपर्यंत असून दि.३०/१०/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि.०६/११/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा**
**प्रशासक**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३ Email: panvelcorporationgmail.com

कार्यालय जा. क्र. पमपा/कर२०७३/२०२५ दिनांक : २८/१०/२०२५

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याव्दारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहीतील नांवात बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं/प्रॉ.नं./फा. प्लॉट नं. सदनिका/गाळा क्र. | जुने नाव | नविन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | फा. प्लॉट नं. २९०/१, गाळा क्र.५८ नॅशनल पॅराडाइज, तक्का, पनवेल PNVL०३४३१३३ | श्री. निरजकुमार उपाध्याय | श्री.रजत प्रेमकुमार गोयल |
| २ | १३ | आझाद नगर झोपडपट्टी झोपडी नं. T/११० V१३Z३००६०११ | भोगवटदार - श्री. प्रविण कामसेन पाटील | श्रीमती उमा महावीर गुप्ता |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणा-या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क ३१२५/प्र.क्र. ५३८/५५७/२०२५**

**सही/-**
**(महेश गायकवाड)**
**कर अधिक्षक**
**पनवेल महानगरपालिका**

## ग्रामपंचायत केवाळे ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : २८/१०/२०२५

ग्रामपंचायत केवाळे यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत केवाळे हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत केवाळे येथे दि.०३/११/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत केवाळे यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत केवाळे हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.०३/११/२०२५ | दि.०३/११/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री.ए.एच.शेख**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रामपंचायत केवाळे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**श्रीमती. रेणुका अशोक गायकर**
**सरपंच**
**ग्रामपंचायत केवाळे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## ग्रामपंचायत हरिग्राम ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : २८/१०/२०२५

ग्रामपंचायत हरिग्राम यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत हरिग्राम हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत हरिग्राम येथे दि.०३/११/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत हरिग्राम यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हरिग्राम हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.०३/११/२०२५ | दि.०३/११/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. दामू बबन पारधी**
**सरपंच**
**ग्रामपंचायत हरिग्राम**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**अर्पणा महेश धायगुडे**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रामपंचायत हरिग्राम**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : २८/१०/२०२५

ग्रामपंचायत सोमटणे यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे येथे दि.०३/११/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.०३/११/२०२५ | दि.०३/११/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**तेजस्विनी आत्माराम पाटील**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**अर्पणा महेश धायगुडे**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत सोमटणे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## ग्रामपंचायत नेरे ता. पनवेल, जि.रायगड

### निविदा सुचना

दि. : २८/१०/२०२५

ग्रामपंचायत नेरे यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत नेरे हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत नेरे येथे दि.०३/११/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत नेरे यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत नेरे हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.०३/११/२०२५ | दि.०३/११/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**राजेश्री पाटील**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रामपंचायत नेरे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**प्रकाश गोपाळ घाडगे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत नेरे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

# परतीच्या पावसाने उरणचे शेतकरी हवालदील

## भातपीके गेली चिखल मातीत

**उरण : प्रतिनिधी**

गेले काही दिवस सुरू असलेल्या परतीच्या पावसाने संपूर्ण उरण तालुक्यासह चिरनेर पूर्व विभागात धुमाकूळ घातला आहे. या परतीच्या पावसाचा फटका सर्व शेतकऱ्यांना बसला आहे. या धुवाधार पावसामुळे उरण पूर्व विभागातील शेकडो एकर भात पीक पाण्याखाली गेले आहे. शेतात साचलेल्या पाण्यामुळे तयार झालेल्या भात पिकांची चिखल माती झाल्याने बळीराजा पुरता उद्ध्वस्त झाला आहे.

उरण तालुक्यातील शेतकऱ्यांचे भात हे एकमेव नगदी पीक आहे. उरणच्या पश्चिम भागात औद्योगिकरणामुळे भात शेती नामशेष झाली असली तरी उरणच्या पूर्व भागात आजही शेकडो एकर शेतात शेतकरी भाताचे पीक घेत आहेत.

वाढती महागाई तसेच मजुरांचे दर वाढल्याने भातशेती सध्या फायद्याची राहिली नाही. तरीही आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी शेतकरी भात पीक घेत आहेत. येथील जमिनीत उच्च प्रतीचा तांदूळ मिळत असल्याने अनेक शेतकरी खर्च करून आवडीने भाताच्या विविध वाणांची लागवड करतात. यावर्षी चांगला पाऊस पडल्यामुळे भातशेती जोमदार झाली होती. त्यात भाताचे पीक सुद्धा चांगले आले होते, मात्र गेल्या आठवड्याभरापासून पडत असलेल्या धुवाधार परतीच्या



पावसामुळे जोमदार पीक शेतात साचलेल्या पाण्याखाली बुडाले आहे. पीक तयार झाल्यामुळे कापणीलाही सुरुवात झाली आहे, परंतु पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे, कितीही प्रयत्न करूनही शेतात साचलेले पाणी कमी होत नसल्याने पाण्यात बुडालेले पीक कुजून त्याची चिखल माती झाल्याचे चित्र शेकडो एकर भात शेतीमध्ये दिसून येत आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला असून तो शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे.

भातपिके पूर्णतः तयार झाली आहेत. त्यामुळे भात पिकांच्या कापणीला सुरुवात होत असतानाच, या पावसाने धुमाकूळ घातला आहे. परिपक्व झालेले भाताचे पीक जमिन दोस्त झाले असून, त्याला पुन्हा कोंब आले आहेत. त्यामुळे हा परतीचा पाऊस शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी मोठ्या चिंतेत सापडला आहे. परतीचा पाऊस हा दरवर्षी असाच धुमाकूळ घालत आहे. गेल्या आठवड्याभरापासून पाऊस दुपारी किंवा सायंकाळी ढगांच्या गडगडाटासह सुरू होतो. मात्र परिस्थिती कशीही असली तरी शेतकऱ्यांना शेतीची कामे ही वेळेतच पूर्ण करावी लागतात. कारण या पुढे शेतकऱ्यांना रब्बी पिकांची पेरणी करायची आहे.

कापणी, बांधणी, झोडणीचे कामे ही हंगामातच करावी लागतात. भात खाचरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे पिके ही आडवी होऊन भाताच्या लोंब्या चिखलात सापडल्या आहेत. तसेच कापून ठेवलेली भात पिके भिजून पार कुजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

**शेतीचे नुकसान पाहता राज्य सरकारने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. परंतु केवायसी, फार्मर आयडी या नियम, अटी, निकषांमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल याची खात्री वाटत नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे.**
**-प्रमोद पाटील, शेतकरी चिरनेर**

**परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या भात शेतीचे सर्वेक्षण सुरू आहे. त्यानंतर शासकीय निर्णयानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल.**
**-सुषमा गायकवाड,**
**कृषी सहाय्यक अधिकारी**

# विमा कंपनीच्या मॅनेजरकडून महिला सहकाऱ्यावर अत्याचार; गुन्हा दाखल

## अश्लील चित्रीकरण करून खंडणी उकळली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कॉर्पोरेट क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असलेल्या एका मॅनेजरकडून महिला सहकाऱ्यावर लैंगिक अत्याचार करून तिचे अश्लील चित्रीकरण केल्याचा आणि त्याच व्हिडिओच्या माध्यमातून लाखो रुपयांची खंडणी उकळल्याचा धक्कादायक प्रकार पनवेल येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणात आरोपी मॅनेजरसह त्याची पत्नी गुन्ह्यात सहभागी असल्याचेही समोर आले असून, पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली आहे.

पनवेल शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रदीप नामदेव नरळे (वय ३४) असे असून तो अंधेरी येथील एका विमा कंपनीत ब्रँच मॅनेजर म्हणून कार्यरत होता. त्याची पत्नी रेणुका नरळे आणि भाऊ प्रविण नरळे हे दोघेही या प्रकरणात सहआरोपी असून सध्या फरार आहेत. पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.



तक्रारीनुसार, आरोपी नरळे याची ओळख त्याच्याच कंपनीच्या नागपूर शाखेत कार्यरत असलेल्या ३२ वर्षीय महिला सहकाऱ्याशी ऑनलाईन मीटिंगदरम्यान झाली होती. कामाच्या निमित्ताने झालेली ही ओळख पुढे वैयक्तिक नात्यात बदलली. २७ मार्च रोजी कामानिमित्त मुंबईत आलेल्या त्या महिलेला नरळे याने पनवेल येथील आपल्या घरी बोलावले. पाहुणचाराच्या बहाण्याने दिलेल्या जेवणात त्याने गुंगी आणणारे औषध मिसळले. त्यानंतर पीडित महिलेला बेशुद्धावस्थेत ठेवून तिच्यावर बलात्कार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

याहूनही धक्कादायक बाब म्हणजे, या गुन्ह्याचे चित्रीकरण आरोपीच्या पत्नीने केले असल्याचे पुरावे पोलिसांच्या हाती लागले आहेत. त्यानंतर आरोपी दाम्पत्याने या व्हिडिओच्या माध्यमातून पीडित महिलेला धमकावत तिच्याकडून मोठी आर्थिक खंडणी उकळली. अत्याचार आणि धमकीच्या या चक्रातून कंटाळून अखेर पीडित महिलेने पनवेल शहर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

तक्रार मिळताच पोलिसांनी सापळा रचून प्रदीप नरळे याला अटक केली असून, त्याच्या पत्नी व भावाचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले आहे.

# बँक ऑफ इंडियामध्ये प्रामाणिकपणाची शपथ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भ्रष्टाचारमुक्त भारताच्या संकल्पनेला अनुसरून, बँक ऑफ इंडिया, नवी मुंबई विभागाने सोमवारी (दि.२७) आपल्या नवी मुंबई विभागातील सर्व शाखांमध्ये सतर्कता जागृती सप्ताह - २०२५ साजरा केला. हा कार्यक्रम आपल्या देशाचे पहिले उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आला.

या उपक्रमाची सुरुवात विभागीय कार्यालय, आरबीसी, एसएमई सिटी सेंटर्स तसेच विभागातील इतर ६२ शाखांमध्ये प्रामाणिकतेची शपथ घेऊन करण्यात आली. या शपथविधीचे नेतृत्व विभागीय व्यवस्थापक शशिकांत सदाभर्तिया, उपविभागीय



व्यवस्थापक अंतर्यामी सारंगी, तसेच सहायक महाव्यवस्थापक, मुख्य व्यवस्थापक, शाखा व्यवस्थापक आणि सर्व कर्मचारी - एकूण ७०० हून अधिक अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदवून केले.

या वेळी कार्यक्षेत्रात तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रामाणिकपणा आणि सचोटीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. बँक ऑफ इंडिया ही संस्था नैतिक व्यावसायिक मूल्यांचे पालन, पारदर्शकता आणि प्रामाणिकतेची संस्कृती जोपासणे यासाठी कटिबद्ध आहे. बँकेने लाच न देणे आणि न घेणे, सर्व कार्ये प्रामाणिक व पारदर्शक रीतीने करण्याची, तसेच सार्वजनिक हिताचे रक्षण करत हितधारक व समाजाच्या हक्कांचे संरक्षण करण्याची शपथ घेतली.

# नवी मुंबईत विविध ठिकाणी छटपूजा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात विविध ठिकाणी छटपूजा उत्साहात साजरी करण्यात आली. जवळजवळ हजरोंच्या संख्येने उत्तर भारतीय बांधव नवी मुंबईतील सार्वजनिक तलावांच्या येथे हजर होते. पालिकेने दिलेल्या स्वच्छतेच्या नियमांचे पालन करत छट पूजा साजरी करण्यात आली. सूर्याला अर्घ्य अर्पण करून पूजा करण्यात आली. नवी मुंबईत पालिकेच्या आठही विभागांतील तलावांवर तसेच ज्वेल ऑफ नवी मुंबई, वाशी चौपाटी येथे मोठ्या



प्रमाणात उत्तर भारतीय नागरिक जमले होते.

हिंदी वर्षानुसार शुक्लपक्ष चतुर्थीनुसार छटपूजेला सुरुवात होते. एकूण चार दिवस हा सण उत्तर भारतीयांकडून साजरा करण्यात येतो. बुधवारी षष्ठी असल्यामुळे सर्व भाविक पाण्यात उभे राहून सुर्यास्तापासून पूजा केली. चतुर्थी आणि पंचमी या दोन दिवसांत आपल्या घरीच हा सण साजरा केला जातो. तर षष्टीला सूर्यास्ताच्या वेळेपासून ते रात्री ८ वाजेपर्यंत सूर्याची पूजा पाण्यात उभी राहून केली जाते तर दुसऱ्या दिवशी म्हणजेच सप्तमीला पहाटे ५ वाजल्यापासून ते सूर्योदय होईपर्यंत सूर्याची पूजा केली जाते. या पूजेला लहांनापासून मोठ्यांपर्यंत अगदी सर्व कुटुंब जातीने हजर होते. या वेळी स्त्रिया विविध सांस्कृतीक गाणी म्हटली व पूजा केली.

या वेळी गव्हासारख्या विशिष्ठ पदार्थाचा नैवेद्य दाखवण्यात आला. तसेच त्याच बरोबर विविध फळेदेखील नैवेद्य म्हणून दाखविला गेला. या सणाला स्त्री आणि पुरुष असे दोघेही पूजा करतात.

# गाण्याच्या कार्यक्रमाने सणाची रंगत द्विगुणित

**रसायनी : प्रतिनिधी**


रसायनी ब्राह्मण संघातर्फे दिवाळी पहाटचे आयोजन केले होते. यावर्षीचे हे दिवाळी पाहत आयोजन करण्याचे तिसरे वर्ष आहे. वर्षभरातील सर्वात मोठ्या सणाची रंगत या गाण्याच्या कार्यक्रमाने द्विगुणित होते. या वर्षी सुरताल म्युझिकल ग्रुप, सावळे, कर्जत या संघाने कार्यक्रमात भावगीत, भक्तीगीत, देशभक्तीपर गीत ई. गाणी सादर केली. सुरताल म्युझिकल संघाचे प्रमुख जगदीश बुवा धुळे (संगीत विशारद), मिलिंद धुळे (तबला वादन, साऊंड ऑपरेटर), निधी धुळे (गायिका), अद्री धुळे (गायिका), भानुदास गायकवाड (निवेदक) या सर्व कलाकारांनी उत्तम सादरीकरण केले.



यासाठी रसायनी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष विष्णू जोगळेकर, कोषाध्यक्ष विनय सोहनी, गणपती मंदिर मोहोपाडाचे अध्यक्ष सुनील सोमण, संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास कुलकर्णी, पेण ब्राह्मण संघाचे अध्यक्ष महेश हेलवडे आणि सहकारी, तसेच रसायनी विभागातील ब्रह्मवृंद, व इतर रसिक श्रोते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.














# रोहा अष्टमी बँक भागभांडवलदार आणि ठेवीदाराची जिल्हा उपनिबंधक कार्यालयावर धडक

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी अर्बन बँकेची इमारत आणि जागेच्या लिलाव प्रक्रियेत झोलझपाट झाला होता. बँकेच्या भागभांडवरदार आणि ठेकेदारांनी मोठा गदारोळ केल्यावर हादरलेल्या सहकार विभागाने हा लिलाव रद्द करण्याचे आदेश दिले. मात्र यानंतरही रायगड जिल्हा उपनिबंधकांनी आजपावेतो या लिलाव प्रक्रियेला स्थगिती दिली नाहीच, शिवाय बिल्डरचे नाव थेट बँकेच्या प्रॉपर्टी कार्डवरच चढवले आहे. त्यामुळे सहकार मंत्र्यांच्या आदेशाला प्रशासनाने केराची टोपली दाखवल्याचे स्पष्ट झाले आहे. यामागे काही राजकीय गौडबंगाल आहे का? असा सवाल रोहेकरांनी केला आहे.

रोहा अष्टमी अर्बन बँकेच्या इमारतीसह जमीन कस्टोडियन निलेश शिंदे यांनी कवडीमोल भावात लब्धी बिल्डरच्या घशात घातली. या मालमत्तेची किंमत चार कोटी असताना अवघ्या एक कोटी दहा हजार रुपयांत हा व्यवहार करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे बिल्डरचे नातेवाईक रोहा अष्टमी अर्बन बँकेचे डिफॉल्टर असतानाही निविदा प्रक्रियेत झोल करून हा व्यवहार करण्यात आला. या सर्व प्रकरणात अनियमितता झाल्याचे पत्र सहकार विभागाच्या अवर सचिव मंजुषा साळवी यांनी जानेवारी महिन्यात जिल्हा उपनिबंधकांना पाठवले होते. मात्र तरीही आजपावेतो लिलाव स्थगितीबाबतीत जिल्हा उपनिबंधकांनी कुठलिही कार्यवाही केलेली नाही.

त्यामुळे बँक कवडीमोल भावाने विकत घेणाऱ्या लब्धी बिल्डरना राजाश्रय तरी कुणाचा, असा प्रश्न विचारत भागभांडवलदार आणि ठेविदारांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. तसे पत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड–अलिबाग यांना दिले असून बँक इमारत खरेदीखत तात्काळ रद्द करावे आणि कष्टोडियन निलेश शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करावा असा निर्वाणीचा इशारा दिला आहे. ही कार्यवाही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाने पुढील १५ दिवसांत करावी, अन्यथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयासमोर दि. १९ नोव्हेंबर रोजी भागभांडवलदार व ठेवीदार उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# आदर्श पतसंस्थेचा आता स्वतंत्र गोल्ड विभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर झेप घेणारी अलिबाग येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने ग्राहकांच्या सेवेसाठी आपला स्वतंत्र आदर्श गोल्ड विभाग सुरू केला आहे. टेलिफोन एक्सचेंज कार्यालया जवळ, नागडोंगरी, अलिबाग येथे हा विभाग सुरू करण्यात आला आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था आपल्या ग्राहकांसाठी विविध सेवा देत असते. आदर्शच्या शाखांमधून सोने तारण कर्ज दिले जाते. परंतु आता स्वतंत्र गोल्ड विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागातून केवळ सोनेतारण कर्जच देण्यात येणार आहे. स्वतंत्र गोल्ड विभाग सुरू करणारी आदर्श तंस्था ही रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था आहे. येथे सावकारी नाही तर सहकारी दराने गोल्ड लोन उपलब्ध होणार आहे.

रायगड जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक मा. प्रमोद जगताप यांच्या शुभ हस्ते सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी आदर्श गोल्ड विभागाचे उद्घाटन करण्यात आले.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजित पाटील, संचालक सतिश प्रधान, महेश चव्हाण, श्रीकांत ओसवाल, ॲड. रेश्मा पाटील, ॲड. वर्षा शेठ, विलाप सरतांडेल, सल्लागार व मार्गदर्शक नितीन वाणी, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# झोराबियन चिकन कंपनीवर दरोडा, म्होरक्या ताब्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

तोतया पोलीस पथक बनून माणकिवली गावचे हददीतील झोराबियन चिक्स प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीमध्ये दरोडा घालणाऱ्या टोळीचा म्होरक्याला अटक, करण्यात खालापूर पोलीसाना यश मिळाले आहे.

१५ ऑक्टोंबर रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास माणकिवली गावचे हददीतील झोराबियन चिक्स प्रायव्हेट लिमिटेड येथे नऊ ते दहा जणांनी पोलीस असल्याची बतावणी करुन त्यांना कंपनीची झडती घ्यायचे असल्याचे सांगितले. तिथे काम करणारा व्यवस्थापक याला बेडी घालुन कंपनीमध्ये नेवुन तसेच कंपनीमध्ये वजन काटयाच्या येथे असलेला ऑपरेटर याला वजन काटयाच्या केबीनमध्ये डांबुन ठेवले होते. ऑफिसमधुन २०हजार १९० रुपये रोख रक्कम व १०हजार रुपये किंमतीचा डीव्हीआर मशीन चोरी करुन नेला होता. कोणताही पुरावा मागे राहू नये यासाठी डीव्हीआर बॉक्स देखील चोरट्याने सोबत नेल्याने पोलीस तपासाला खीळ बसली होती.

खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तळोजा येथून एकाला ताब्यात घेतले असून दरोड्याचा सूत्रधार असून त्याच्या मालकीचे रिसॉर्टदेखील असल्याची माहिती मिळाली आहे. इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

# श्रीवर्धन महेश्वर आळी मित्रमंडळ किल्ले स्पर्धेत सहावे

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरातील महेश्वर आळी मित्र मंडळ या मंडळाने महाराष्ट्र राज्यस्तरीय गड किल्ले स्पर्धा इको पंढरी मध्ये सहावा क्रमांक प्राप्त केला आहे. इको पंढरी प्रस्तुत गडकिल्ले बांधणी स्पर्धा २०२५ दिवाळीनिमित्त विशेष आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी अनिवार्य होती. यामध्ये महेश्वर आणि मित्रमंडळाने आपली नाव नोंदणी करून सहभाग घेतला होता. महेश्वर आळी मित्रमंडळाने राजगड किल्ल्याची प्रतिकृती साकारली होती.

अतिशय सुंदर व मनमोहक असा किल्ला या मंडळातर्फे बनवण्यात आला होता. इको पंढरी या संस्थेकडे सदर गड किल्ल्याची छायाचित्रे, त्याचप्रमाणे रील बनवून पाठवण्यात आली होती. महेश्वर आळी मित्रमंडळाला १५० किल्ल्यांपैकी सहावा क्रमांक प्राप्त झाला आहे. यामध्ये एक ते दहा क्रमांक प्राप्त करणाऱ्या सर्व मंडळांना चषक व प्रशस्तीपत्रक देण्यात आले आहे. किल्ल्याची सुंदर अशी प्रतिकृती साकारण्यासाठी महेश्वर आळी मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी खूप मेहनत घेतली होती. अनेक मान्यवरांकडून सदर मित्र मंडळास शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान, ता. कर्जत, जिल्हा रायगड. ४१० १०२**
**ई–मेल आयडी : mcomatheran@gmail.com**

जावक क्र. मागिनप : ८७७/२०२५–२६ — दिनांक : २४/१०/२०२५

**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद,जि. रायगड**

**निविद सुचना–२०२५–२०२६**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद खालील कामाकरिता शासकीय किवा नोंदणीकृत अ– शासकीय पुरवठादार यांचेकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद मार्वत्रिक निवडणूक २०२५करीता लागणारे मंडप डेकोरेशन, विद्युत व्यवस्था, लाईटम, हॅलोजन लाईटस, इत्यादी पुरवठा करणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |
| २ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता लागणारे कपाट, स्टील पेट्या, टेबल, खुर्चा ईत्यादी पुरवठा करणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |
| ३ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ लागणारे बॅनर, फ्लेक्स, बोर्ड व जनजागृती साहित्य इत्यादी पुरवठा करणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून |
| ४ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता मतदान केंद्राकरीता आवश्यकतेनुसार बांधकाम दुरुस्ती, इलेक्ट्रिक दुरुस्ती, इत्यादी सोयी–सुविधा पुरविणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |
| ५ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता आवश्यकते नुसार मतदान केंद्रावर सि.सि.टी.व्ही. कॅमेरे इत्यादी तात्पुरते व तात्काळ बसविणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |
| ६ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता आवश्यकते नुमार वाहन पुरवठा करणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |
| ७ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता आवश्यकते नुमार वाहनाम GPS सिस्टीम तात्पुरती व तात्काळ बसविणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |
| ८ | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता चहा, अल्पोपहार, जेवण इत्यादी पुरवठा करणे बाबत. | कार्यादेश मिळाल्या पासून १ वर्ष |

**अटी– शर्ती**

१. निविदा पत्रक विक्रीची किंमत रक्कम रुपये ५००/– ना परतावा नगरपरिषद कार्यालयात रोखीने भरून सुट्टीचे दिवस वगळता दिनांक २९/१०/२०२५ ते ०७/११/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत संबंधीत विभागात मागणी अर्ज केल्यानंतर उपलब्ध होतील. निविदा फॉर्म फी भरल्याची पावती दाखविल्या शिवाय कोरे निविदा फॉर्म दिले जाणार नाहीत.
२. निविदे संबधीची अनामत रक्कम रुपये ३०००/– डी.डी. द्वारे अथवा रोख स्वीकारण्यात येईल. निविदेसोबत अनामत रक्कम भरल्याचा डी.डी./ रोख पावती जोडणे अवश्यक आहे.
३. सिलबंद निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक. १०/११/२०२५ रोजी ५.०० वाजेपर्यत असून, शक्य झाल्यास सिलबंद निविदा सायंकाळी ५.३० वाजता त्याच दिवशी अथवा नगरपरिषदेच्या सोयीनुसार मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात हजर असलेले निविदा धारक किवा प्रनिनिधी यांचे ममक्ष उघडण्यान येतील.
४. प्रत्येक कामाचा निविदेचा लिफाफा क्र. १. व लिफाफा क्र. २ असे राहतील. तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ मध्ये अ) अनामत रक्कम भरल्याचा डी.डी./ रोख पावती ब) नोंदणी प्रमाणपत्र व निविदा फॉर्म सोबत असलेले सर्व परिशिष्ट भरून जोडणे आवश्यक आहे.
क) संविदेमध्ये पदाधिकाऱ्याचा सहभाग नसल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र. ड) पुरवठाधारक अधिकृत असल्याचे प्रमाणपत्र तसेच लिफाफा क्र .२ मध्ये पुर्ण भरलेली वित्तीय निविदा असेल.
५. लिफाफा क्र. १ उघडून छाननीअंती त्यातील तांत्रिक कागदपत्रे योग्य असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. कागदपत्र सीलबंद करण्याचे आहेत.
६. निविदापत्रके पोस्टाने पाठविल्यास स्वीकारली जाणार नाहीत. मंजूर पुरवठाधारकास आवश्यक त्या स्टॅम पेपर वर नगरपरिषदेच्या अटी–शर्ती नुसार करारनामा करून द्यावा लागेल.
७. कामाची ऑर्डर, कार्यादेश, दिल्याप्रमाणे तातडीने विहित कालावधीत साहित्याचा पुरवठा करावा लागेल. कार्यादेश अधिकृत ई–मेल किंवा आपल्या नमूद मोबाईल क. WHATTS APP द्वारेही देण्यात येतील.
८. प्राप्त निविदापैकी कोणतीही १ निविदा स्विकारण्याची अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे. त्याची कारणे दिले जाणार नाहीत.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, करिता**

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **संजय नामदेव भोईर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३२४)**
**(ULPIN: २९११२९१०४०४), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७४/५ | २ | ०.५७.२० पो.ख. ०.१२.२० | ६.७५ |
| | | एकुण ०.६९.४० | |
| एकुण क्षेत्र ०.६९.४० गुंठयाचे खरेदीखत | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/१०/२०२५**

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा – रायगड– ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **संजय नामदेव भोईर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३२४)**
**( ULPIN) : २२८११५४१२३५), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७६/३ | २ | ०.३३.६० पो.ख. ०.०३.८० | २.४४ |
| | | एकुण ०.३७.४० | |
| एकुण क्षेत्र ०.३७.४० गुंठयाचे खरेदीखत | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी

**दिनांक : २९/१०/२०२५**

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा – रायगड– ४१०२०६**
**मो.क्र. ९९२०४७५८०१**

## कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल.

नोंदणी क्र. : आर.जी.डी. (पी.डब्ल्यू.एल.) आर.एस.आर. (सी.आर) ५१८/३१–८–१९९५.
मुख्यालय कार्यालय :– ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराशेजारी, टिळक रोड, पनवेल – जि. रायगड. ४१० २०६. फोन : ८०८२५५५४०८, ८१०८२९४९९१. Email - kamalmahila@yahoo.in

### स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नासनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्यांचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे,

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं. व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रु.पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रामदास भिकाजी जाधव मौजे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जुही अपार्टमेंट, रूम नं– डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर–६अे | पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील आणि सब–रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे कामोठे जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर–६ अे, क्षेत्र ३९४ चौ. फुट बिल्टअप | ३९४ चौ. फुट बिल्टअप | ३९४ चौ. फुट बिल्टअप | | सोमवार दिः १७/११/२०२५ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट नं–१, ६२६, मारुती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

टिप–
१) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाच्या वेळी करण्यात येईल.
२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) अपसेट व्हॅल्यू रु. ३२,९९,८९५/– (अक्षरी बतीस लाख नव्याण्णव हजार आठशे पंच्याण्णव रुपये मात्रा याचे वरती बोली करावी लागेल.

**स्थळ :** पनवेल
**तारीख : २८/१०/२०२५**

शिक्का

**सही/–**
**(सुनिल सदानंद गद्रे)**
**विशेए वसुली व विक्री अधिकारी**
**वसुली अधिकारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त**

## कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल.

नोंदणी क्र. : आर.जी.डी. (पी.डब्ल्यू.एल.) आर.एस.आर. (सी.आर) ५१८/३१–८–१९९५.
मुख्यालय कार्यालय :– ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराशेजारी, टिळक रोड, पनवेल – जि. रायगड. ४१० २०६. फोन : ८०८२५५५४०८, ८१०८२९४९९१. Email - kamalmahila@yahoo.in

### जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस

**जा. क्र. ३१/५१०/२०२५–२०२६, वसुली–स्थावर जाहीरनामा**
**वसुली अधिकारी यांचे कार्यालय**
**दिनांक: २८/१०/२०२५**

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रु. २२,९७,०१५/– (अक्षरी बावीस लाख सत्याण्णव हजार पंधरा रुपये मात्र) अधिक दि. २८/१०/२०२५ पासूनचे पुढे होणारा व्याज येणे पोटी श्री. रामदास भिकाजी जाधव रा. कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३अे, सेक्टर–६अे, ता–पनवेल, जि–रायगड यांची खाली नमुद केलेली मालमता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमता जाहीर लिलाव पद्धतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. रामदास भिकाजी जाधव रा. कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३अे , सेक्टर–६अे, ता–पनवेल, जि–रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभाश या प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरवलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिक राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. १७/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दु. १.०० वाजला कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल श्री सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे **जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३अे, सेक्टर–६ अे, ता–पनवेल, जि–रायगड, कामोठे,** या मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करतील,

**स्थावर मिळकतीचा तपशील**

| अ.क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकारविरुद्ध प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क्र. सी. सी./आर.जी. डी/३८/२०२३ दि. २७/०६/२०२४ | श्री. रामदास भिकाजी जाधव<br>श्री. गोविंद देवराम कदम<br>श्री. श्रीमंत केशव खांडेकर | कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. | जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३अे, सेक्टर–६अे, ता–पनवेल, जि–रायगड, कामोठे | ३९४ चौ. फुट बिल्टअप | — | श्री. रामदास भिकाजी जाधव | नाही | |

उक्त मालमतेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपाटन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रु. ३२,९९.८९५/– अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमता यापूर्वीच जप्ती आदेश देवून वसुली स्थावर जप्ती दिनांक ०९/०९/२०२५ जप्त करून ताब्यात घेण्यात आली.

**स्थळ :** पनवेल
**तारीख : २८/१०/२०२५**

शिक्का

**सही/–**
**(सुनिल सदानंद गद्रे)**
**विशेए वसुली व विक्री अधिकारी**
**वसुली अधिकारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त**

# भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० मॅच मोफत पाहता येणार

**ओव्हल : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघ पुन्हा एकदा आमनेसामने येणार आहेत. एकदिवसीय मालिकेनंतर, आता टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका आता रंगेल. पाच सामन्यांची मालिका २९ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. ही मालिका आता ८ नोव्हेंबरला संपेल. भारताने एकदिवसीय मालिका गमवली पण आता टी-२० मालिका जिंकण्यासाठी भारताचा टी-२० संघ शर्थीचे प्रयत्न करेल.



India vs Australia T20 Series चा पहिला सामना २९ ऑक्टोबर रोजी कॅनबेरा येथे खेळला जाईल. या मालिकेचे प्रसारण हक्क स्टार स्पोर्ट्सकडे आहेत. जर तुम्हाला टीव्हीवर सामना पहायचा असेल तर तुम्ही स्टार स्पोर्ट्स चॅनेलवर जाऊ शकता. लाईव्ह सामने अनेक स्टार चॅनेलवर पाहता येतात, जिथे तुम्ही तुमच्या पसंतीच्या भाषेत समालोचन ऐकू शकता. जर तुम्हाला तुमच्या मोबाईलवर सामना पहायचा असेल तर तुम्हाला जिओ हॉटस्टारवर जावे लागेल.

जर तुम्हाला सामने मोफत पहायचे असतील तर ते करण्याचा एक मार्ग आहे. भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामना डीडी स्पोर्ट्सवरदेखील मोफत दाखवला जाईल. स्टार स्पोर्ट्स आणि जिओ हॉटस्टार व्यतिरिक्त, जर तुम्हाला इतरत्र सामना पहायचा असेल तर तुम्ही तो दूरदर्शन स्पोर्ट्सवर देखील पाहू शकता. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. एकमेव अट अशी आहे की तुमच्याकडे डीडी फ्री डिश असणे आवश्यक आहे. यानंतर, तुम्ही कोणत्याही शुल्काशिवाय सामना सहजपणे पाहू शकता. दूरदर्शन स्पोर्ट्सने सांगितले आहे की ते पाचही सामने थेट प्रक्षेपित देखील करतील.

सूर्यकुमार यादव या मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व करेल. भारतीय संघात नितीश कुमार रेड्डीच्या जागी आता संघात कोणाचा समावेश होईल याकडे चाहत्यांच्या नजरा असणार आहेत.

## कर्णधार टेम्बा बवुमाचे पुनरागमन

**केपटाऊन :** कर्णधार टेम्बा बवुमा पोटरीच्या दुखापतीतून सावरला असून भारताविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी दक्षिण आफ्रिका संघात त्याचे पुनरागमन झाले आहे. ही मालिका १४ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून सामने गुवाहाटी आणि कोलकाता येथे खेळवले जाणार आहेत.

बवुमा अलीकडेच पाकिस्तानमध्ये झालेल्या दोन सामन्यांच्या मालिकेत खेळू शकला नव्हता. ही मालिका बरोबरीत सुटली होती. पाकिस्तान दौऱ्यावरील बहुतांश संघ कायम ठेवण्यात आला असून, डेव्हिड बेडिंगहॅमच्या जागी बवुमाची संघात वर्णी लागली आहे.

याच मालिकेतून ऋषभ पंतही दुखापतीनंतर पुनरागमन करणार आहे.

## ठाणे जिल्ह्यातील फुटबॉल खेळाडूंसाठी निवड चाचण्या

**ठाणे : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या प्रोजेक्ट महादेवा या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील १३ वर्षांखालील मुले-मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी निवड चाचण्या १ नोव्हेंबर रोजी (मुले) आणि २ नोव्हेंबर रोजी (मुली) अशा दोन दिवसांत आयोजित करण्यात आल्या आहेत.

या निवड चाचण्या नवी मुंबई, नेरुळ येथील यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदानावर सकाळी ८ वाजल्यापासून पार पडतील. ही योजना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान संशोधन अकादमी (MITRA), क्रीडा विभाग, WIFA, सिडको आणि VSTF यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. राज्यातील फुटबॉल क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा यामागचा उद्देश आहे. इच्छुक खेळाडूंनी निवड चाचण्यांपूर्वी दिलेल्या गूगल फॉर्मद्वारे ३० ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.

जिल्हास्तरावरील निवड चाचण्या, प्रादेशिक फेरी आणि अंतिम निवड फेरी अशा तीन टप्प्यात या निवड प्रक्रिया पार पडणार आहेत. अंतिम टप्प्यात ६० मुलांची निवड सीआयडीसीओ ग्राऊंड, खारघर येथे आणि ६० मुलींची निवड डब्ल्यूआयएफए कूपरेज मैदान, मुंबई येथे केली जाईल. प्रत्येकी ३० मुलगा मुलींची निवड केली जाईल आणि त्यांना पाच वर्षांची एकात्मिक शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ज्यामध्ये फुटबॉल प्रशिक्षणासोबत शैक्षणिक विकासाचाही समावेश असेल.

निवड झालेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर रोजी मुंबईत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टार लिओनेल मेस्सी यांच्या फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळेल. या निवड चाचणीमध्ये सहभागी होण्याकरिता खेळाडूंनी https://forms.gle/1mwckj3XokoRQbb98 या गुगल लिंक द्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे.

हा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा असून, राज्यातील फुटबॉल खेळाला नवी दिशा देणारा आहे.महादेवा या महत्त्वाकांक्षी योजनेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी केले आहे.



## जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत जानकीबाई ठाकूर स्कुलचे यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

शिक्षण विभागातर्फे क्रीडा संकुलन अलिबाग नेहुली येथे भरविण्यात आलेल्या कराटे मार्शल आट्र्स स्पर्धेत आवरे येथील आत्माराम ठाकूर मिशन संचलीत जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मेडियम स्कूलने घवघवीत यश संपादन केले आहे.

तब्बल दहा पदकांची लयलूट या शाळेने केली आहे. अनुक्रमे दोन सुवर्ण, दोन रजत आणि एक कांस्यपदक पदक पटकाविले आहे. विशेषता: या खेळाडूंची निवड ही प्रादेशिक स्तरावर झाली आहे. शौर्य संदीप म्हात्रे व जाग्रवी जोमा भोईर हे खेळाडू सुवर्णपदकाचे मानकरी तर अक्षा उत्तम गावंड व नुपूर किरण पाटील हे रजत पदकाचे मानकरी ठरले आहेत.

प्रशिक्षक शुभम ठाकूर, मुख्याद्यापिका निकिता म्हात्रे, वामन ठाकूर, अलका ठाकूर, सिंधू ठाकूर, प्रसाद ठाकूर, प्रतीक ठाकूर, आदिनाथ ठाकूर, श्रीकांत ठाकूर, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध सूर्यकुमार इतिहास रचण्याची संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २९ ऑक्टोबरपासून पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका सुरू होत आहे. या मालिकेत भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे, कारण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या या मालिकेत सूर्यकुमारला माजी कर्णधार रोहित शर्मा आणि स्टार फलंदाज विराट कोहली या दोघांनाही मागे टाकून एक महत्त्वपूर्ण विक्रम करण्याची संधी आहे.

रोहित शर्मा टी-२०मधून निवृत्त झाल्यानंतर सूर्यकुमार यादवची कर्णधारपदी निवड करण्यात आली होती. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी मालिकेत सूर्यकुमारला ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थान मिळवण्याची संधी आहे. सध्या सूर्यकुमारने ऑस्ट्रेलियात नऊ षटकार मारले आहेत. जर त्याने या मालिकेत आणखी १२ षटकार मारले, तर तो ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज ठरेल आणि विराट कोहलीला मागे टाकेल. सूर्यकुमार यादवची ऑस्ट्रेलियातील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये कामगिरी खूपच प्रभावी राहिली.

## प्रतिका रावलच्या जागी शफाली वर्माला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने वनडे विश्वचषक स्पर्धेच्या सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सेमीफायनल सामना ३० ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे, पण या सामन्यापूर्वी भारताची फॉर्मात असलेली सलामीवीर प्रतिका रावल दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाली आहे. तिच्या जागी 'लेडी सेहवाग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शफाली वर्माला संघात स्थान देण्यात आले आहे.



बांगलादेशविरुद्ध गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना प्रतिकाच्या उजव्या पायाला दुखापत झाली. यानंतर ती फिजिओचा आधार घेत मैदानाबाहेर गेली. क्षेत्ररक्षण करताना प्रतिकाचा उजवा पाय मुरगळल्याने ती बांगलादेशविरुद्ध सामन्यात फलंदाजीसाठी आली नाही. ती ३० ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात खेळू शकणार नाही. प्रतिका रावल स्पर्धेबाहेर होणे ही टीम इंडियासाठी खूप वाईट बातमी आहे, कारण ही खेळाडू उत्कृष्ट फॉर्ममध्ये होती.

प्रतिका रावलने तिच्या पहिलाच एकदिवसीय विश्वचषकाच फलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली. ती चांगल्या फॉर्मातही होती, तिने पहिल्याच वर्ल्डकप स्पर्धेत शतक झळकावण्याचा विक्रमही केली. प्रतिकाने सात सामन्यांमध्ये ३०८ धावा केल्या आहेत, ज्यात एक शतक आणि एक अर्धशतकही झळकावले आहे.

प्रतिका रावलच्या जागी आता भारताची जुनी सलामीवीर शफाली वर्माला संधी देण्यात आली आहे. शफालीने भारतासाठी २९ एकदिवसीय सामने खेळून २३च्या सरासरीने ६४४ धावा केल्या आहेत. तिने वनडे कारकिर्दीत चार अर्धशतके झळकावली आहेत, ज्यामध्ये नाबाद ७१ धावा ही तिची सर्वोत्तम धावसंख्या आहे. तिने ऑक्टोबर २०२४मध्ये अहमदाबाद येथे न्यूझीलंडविरुद्ध भारतासाठी शेवटचा एकदिवसीय सामना खेळला होता.



## पहिल्या ॲशेस कसोटीला कमिन्स मुकणार; स्मिथकडे नेतृत्व

**कॅनबेरा : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स पाठीच्या दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्धच्या ॲशेस कसोटी क्रिकेट मालिकेतील पहिल्या सामन्याला मुकणार आहे. पर्थ येथे २१ नोव्हेंबरपासून होणाऱ्या या सामन्यात कमिन्सच्या अनुपस्थितीत स्टीव्ह स्मिथ ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व करेल. जायबंदी कमिन्स जुलैपासून मैदानाबाहेर आहे.

'पहिल्या कसोटीपूर्वी कमिन्स तंदुरुस्त होण्याबाबत आम्ही आशावादी होतो. त्याला तंदुरुस्त होण्यासाठी चार आठवड्यांहून अधिकचा कालावधी लागेल याचे संकेत आम्हाला याआधीच मिळाले होते. तरीही आम्ही आशा राखली होती, पण आता तो पहिल्या सामन्यासाठी उपलब्ध नसेल हे स्पष्ट झाले आहे. तो दुसऱ्या कसोटीत पुनरागमन करेल असा आम्हाला विश्वास आहे,' असे ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक ॲण्ड्र्यू मॅकडॉनल्ड यांनी सांगितले. पाच सामन्यांच्या या मालिकेतील दुसरा सामना ४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन येथे रंगणार आहे.


'या आठवड्यात कमिन्स गोलंदाजीला सुरुवात करेल. तो दुसऱ्या कसोटी सामन्यापर्यंत तंदुरुस्त होईल अशी अपेक्षा आहे. तो संघासह पर्थला जाईल आणि तेव्हा आम्हाला त्याच्या तंदुरुस्तीचे योग्य आकलनही करता येईल,' असे मॅकडॉनल्ड यांनी सांगितले. स्मिथने २०२१पासून कमिन्सच्या अनुपस्थितीत सहा वेळा ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले आहे.

'स्मिथकडे आम्ही कर्णधारपदाची जबाबदारी दिली आहे. तो अनुभवी कर्णधार असून संघाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे,' असे मॅकडॉनल्ड म्हणाले. कमिन्सच्या अनुपस्थितीत स्कॉट बोलँडला अंतिम ११ खेळाडूंत संधी मिळणे अपेक्षित आहे. पर्थच्या अतिरिक्त उसळी असणाऱ्या खेळपट्टीवर बोलँड, मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड यांची भूमिका ऑस्ट्रेलियासाठी महत्त्वाची ठरेल.

## ॲड. अरमान शेख यांचे गोलंदाजीत सुयश

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर येथे नुकत्याच झालेल्या प्रतिष्ठेच्या नागपूर प्रिमीयर लीग या स्पर्धेत पनवेल शहराचा अभिमान ठरलेले ॲड. अरमान शेख यांनी गोलंदाजीच्या जोरावर इतिहास रचला आहे. एका सामन्यात तब्बल आठ बळी घेत विक्रमी कामगिरी करत त्यांनी संपूर्ण स्पर्धेचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आहे.



या सामन्यात अर्मान शेख यांनी अचूक आणि धडाकेबाज गोलंदाजी करत विरोधी संघाचा पाडाव केला. त्यांनी केवळ ८ बळी घेतले नाहीत, तर एक झेल पकडला आणि एक धावचीत करून सामन्याचा कलच पालटला. एका गोलंदाजाने इतके बळी घेणे ही या स्पर्धेच्या इतिहासातील प्रथमच घडलेली घटना आहे. क्रिकेटच्या पातळीवरही ही कामगिरी अत्यंत दुर्मिळ मानली जाते. त्यामुळे अर्मान शेख यांचा हा पराक्रम राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही चर्चेचा विषय ठरत आहे.

या विक्रमी कामगिरीमुळे पनवेल शहराचाही डंका वाजला असून स्थानिक पातळीवरही अर्मान शेख यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तरुणांना प्रेरणा देणारी ही कामगिरी म्हणूनही या विक्रमाकडे पाहिले जात आहे.

## 'श्रेयस अय्यरची प्रकृती स्थिर'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार क्रिकेटपटू श्रेयस अय्यरला सध्या दुखापत झाली आहे. त्याच्यावर सिडनी येथील रुग्णालयात उपचार चालू आहेत. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यादरम्यान झेल पकडताना त्याला गंभीर दुखापत झाली आहे. सुरुवातीला त्याच्यावर आयसीयूमध्ये उपचार चालू होते. दरम्यान, आता श्रेयस अय्यरच्या प्रकृतीबाबत भारतीय संघाचा टी-२० प्रकारातील कर्णधार सूर्यकुमार यादव याने महत्त्वाची माहिती दिली आहे.

क्रिकबझ या क्रिकेटविषयक माहिती देणाऱ्या वृत्तसंकेतस्थळाने श्रेयस अय्यरच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची अपडेट दिली आहे. ही माहिती देताना सूर्युकमारने दिलेल्या माहितीचा आधार घेतला आहे. सूर्यकुमारने सांगितल्यानुसार भारतीय संघाचे खेळाडू टेक्स्ट मेसेजच्या माध्यमातून श्रेयस अय्यरच्या संपर्कात आहेत. आम्ही पाठवलेल्या मेसेजेसला श्रेयस अय्यर रिप्लाय देत आहे, असे सूर्यकुमारने सांगितले आहे. तसेच श्रेयस अय्यर जर फोनच्या माध्यमातून आमच्या मेसेजेसना उत्तरं देत असेल तर त्याची प्रकृती स्थिर आहे, असे आपण समजू शकतो. त्याची काळजी घेण्यासाठी तिथे डॉक्टर आहेत.

श्रेयस अय्यर आमच्यासोबत बोलतो आहे म्हणजेच त्याची प्रकृती चांगली आहे, असेही सूर्यकुमारने सांगितले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com